# मुलांचे लैंगिक शोषण

## सुरक्षितता त्यांची-
## जबाबदारी आपली



ही पुस्तिका **महिला व बाल विकास विभाग** महाराष्ट्र,
**युनिसेफ** महाराष्ट्र आणि **फॅक्से** मुंबई यांच्या प्रयत्नातून निर्माण झालेली आहे.

२०१६

मुखपृष्ठ व डिझाइनः **चैतन्य मोडक**

# मुलांचे लैंगिक शोषण

## सुरक्षितता त्यांची - जबाबदारी आपली

विद्या आपटे

# संदेश

संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालहक्क संहितेशी बांधिलकी सांगणारा 'लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण' ( पॉक्सो) हा कायदा २०१२ मध्ये पारीत झाला. मुलांसोबत मैत्रीपूर्ण भावनेने तपासकामाची यंत्रणा असण्याबाबत तरतूद केली एवढेच नव्हे तर न्याय व्यवस्थाही बालस्नेही असेल याची खात्री या कायद्याने दिली. त्याचबरोबर बाल लैंगिक शोषणाच्या व्याख्येची व्याप्ती वाढवून आपल्यावरील आरोप खोटे आहेत हे सिध्द करण्याची जबाबदारी आरोपीवर टाकण्यात आली. गुन्ह्याच्या स्वरूपानुसार शिक्षेसंदर्भात तपशीलवार तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

विभागाशी संबंधित असणाऱ्या बाल गृहांमध्ये होत असलेल्या बाल लैंगिक शोषणाविषयीची स्थिती लक्षात घेता अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी आणि अशा घटना घडू नयेत म्हणून सर्व समावेशक पद्धतीने या प्रश्नावर तातडीची गरज म्हणून महिला आणि बाल विकास विभाग आणि युनिसेफ यांनी २०१२ मध्ये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, परिविक्षा अधिकारी आणि बाल कल्याण समितीचे सदस्य यांच्यासाठी व्हिडीओ संवाद आयोजित केला होता. या संवादासाठी तज्ञ म्हणून बाल लैंगिक अत्याचार विरोधी मंचाचे प्रतिनिधी आणि चाईल्ड लाइनचे प्रतिनिधी यांची मदत झाली. बालगृहात बाल लैंगिक शोषणाच्या केसेस घडल्या तर काय करायचे तसेच या बाबतीतील मार्गदर्शक माहितीचाही अभाव असल्याचे त्या संवादातून लक्षात आले आणि या पुस्तिकेची कल्पना पुढे आली.

ही पुस्तिका बालगृहात लैंगिक शोषणाच्या केसेस घडू नयेत किंवा घडल्याच तर काय कार्यवाही करावी यासाठी कायद्याचा आधार घेत, मुलांच्या अधिकारांची काळजी घेत मुलांच्या संपर्कातील काळजीवाहक आणि इतर मोठी माणसे यांच्यासाठी तयार करण्यात आली आहे.

बाल लैंगिक शोषणा बाबतची एक निरंतर भूमिका म्हणून महिला आणि बाल विकास विभागाने सर्वसमावेशक मार्गदर्शिका तयार केली आहे. त्याच बरोबर कायद्याच्या बाबींचे कायदेशीर यंत्रणांसोबत, पोलिसांसोबत, वैद्यकीय कर्मचारी, शिक्षकांसोबत आणि पालकांसोबत नियमित प्रशिक्षण घेण्यात येत आहे. खास बाब म्हणजे बाल लैंगिक शोषणा बाबतच्या केसेस 'मनोधैर्य'

योजने अंतर्गत समाविष्ट केल्या जात आहेत. ज्या मध्ये आर्थिक मदतीची तरतूद लैंगिक आणि ॲसिड दुर्घटनेच्या बळींसाठी आहे. एक एफ. आय. आर. ची प्रत आर्थिक सहकार्य मिळविण्यासाठी पुरेशी आहे. बाल लैंगिक शोषणाच्या केस व्यवस्थापनात वैद्यकीय पातळीवर आणि पोलिसांच्या सोबत तसेच आरोग्य आणि क्षति समुपदेशनासाठी बालस्नेही दृष्टीकोनातून सर्व समावेशक तपासाची प्रक्रिया तयार करण्यात आली आहे.

मला आशा आहे की ही पुस्तिका बाल लैंगिक शोषणाच्या प्रतिबंधासाठी शासनाच्या विविध विभागांना आणि विविध स्वयंसेवी संस्थांना निश्चितच सातत्याने उपयोगी पडेल.

**संजय कुमार**

प्रधान सचिव
महिला आणि बाल विकास विभाग
महाराष्ट्र शासन

# प्रस्तावना

आठ वर्षापूर्वी भारत सरकारने राष्ट्रीय पातळीवर मुलांच्या शोषणाबाबत एक अभ्यास केला होता. त्या अभ्यासात दिसून आलेले निष्कर्ष धक्कादायक होते, सर्वेक्षण करण्यात आलेल्या मुलांपैकी ५३ टक्के मुलांचे लैंगिक शोषण झाले असल्याचे समोर आले. ७० टक्के मुलं आपल्यावर झालेल्या शोषणाबाबत कुणाशीही बोलत नाहीत. ही पुस्तिका म्हणजे शासन आणि स्वयंसेवी संस्था यांनी बाल लैंगिक शोषणाच्या संदर्भात आतापर्यंत केलेले प्रयत्न यातून बाल शोषणाचे सत्य समोर आणण्याचा प्रयत्न आहे.

मुलांचं सुरक्षित आणि संरक्षित असणं अपेक्षित असतांना मुलाचं लैंगिक शोषण ही एक गंभीर बाब आहे. याचा परिणाम मुलांच्या इतर अधिकारांवरही होतांना दिसत आहे. केवळ मुलांचं संरक्षित असणं धोक्यात आलंय असं नाही तर संयुक्त राष्ट्र संघाच्या मुलांच्या अधिकाराच्या जाहीरनाम्यातून बाल हक्कांचा खजिनाच खुला झालाय त्या नुसार एकीकडे आपण मान्य करायचं की मुलांना जगण्याचा अधिकार आहे, कुटुंबात आपली नाती जपण्याचा अधिकार आहे, आपलं मत व्यक्त करण्याचा, आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा त्याचसोबत आपली माहिती गुप्त ठेवण्याचा, खेळण्याचा, शारीरिक, मानसिक, अध्यात्मिक आणि नैतिक विकासाचा अधिकार आहे. शिक्षणाच्या अधिकारासोबत स्वत:चा वेळ आरामदायक असण्यासाठीचा मुद्दा यात आला आहे.

समाजासाठी आणि शासनासाठी हे बंधनकारक आहे की लैंगिक शोषण आणि छळापासून मुलांचं संरक्षण होणं आणि त्याचवेळेस त्यांना शारीरिक आणि मानसिकरित्या सहकार्य करून त्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी मदत मिळवून देणं आवश्यक आहे. मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२, च्या सहकार्याने मुलांच्या लैंगिक शोषणाच्या आणि छळवणूकीच्या संदर्भात खूप काम होणं गरजेचं आहे. शहरी आणि ग्रामिण भागात मुलांच्या सोबत काम करणाऱ्या विविध व्यवस्था, संस्था, कायदेशीर संस्था, पोलिस, वैद्यकीय व्यवस्था आणि

चौकशी करणाऱ्या यंत्रणा ज्यांच्या सहकार्यानं बळीत मुलांचं आणि विशेष करून विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी योग्य असं समुपदेशन आणि पुनर्वसन होऊ शकतं अशा सर्वच सेवांचा दर्जा वाढविण्यासाठी सर्वसमावेशक प्रशिक्षण देण्याची आजच्या काळाची गरज आहे.

मुलांना नेहमी असा विश्वास असतो की आपली घरं, संस्था सार्वजनिक जागा आणि प्रवासाची साधनं या सर्व विश्वासार्ह जागा आहेत. मुलांच्या विश्वासाला तडा जाऊ नये म्हणून आपण सर्व जण जास्तीतजास्त या सर्व ठिकाणी अधिकाधिक पारदर्शकता कशी आणू शकतो हे पाहायला हवं. मुलांच्या विकासात्मक वाढीत महत्वाची भूमिका बजावणारे आपण सर्वजण किमान या विषयावर आपलं म्हणणं, चर्चा आपली भूमिका समोर आणण्याचा प्रयत्न करू शकतो. ही पुस्तिका म्हणजे आपल्या सर्वांसाठी या विषयावर आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे. आम्हाला असा विश्वास आहे की नक्कीच आपल्याला या पुस्तिकेचा उपयोग होईल. या पुस्तिके विषयीच्या आपल्या सूचना निश्चितच स्वागतार्ह आहेत.

महिला आणि बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, बाल लैंगिक अत्याचार विरोधी मंच (फॅक्से) ज्यांच्या सहकार्यानं आम्ही या संदर्भातील पोस्टर आणि वेगवेगळया व्यवस्थांचे, मुलांचे लैंगिक छळवणूकी पासून संरक्षण कायदा या विषयी प्रशिक्षण घेऊ शकलो या सर्वांचे युनिसेफ मनापासून आभार व्यक्त करते. विविध संस्था, महिला आणि बाल विकास विभागाचे अधिकारी ज्यांनी ह्या पुस्तिकेला अंतिम रूप देण्यासाठी सहभाग दिला या सर्वांची मी व्यक्तिश: आभारी आहे.

सर्व जगानं संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बाल हक्क संहितेला स्वीकारून २५ वर्षे होत आहेत या निमित्ताने आपण सर्वजण मुलांवरील अत्याचार संपविण्याची प्रतिज्ञा करूयात........

**राजेश्वरी चंद्रशेखर**
मुख्य अधिकारी
युनिसेफ, महाराष्ट्र

# मनोगत

महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र, युनिसेफ महाराष्ट्र आणि फॅक्से मुंबई यांच्या प्रयत्नातून निर्माण झालेली ही पुस्तिका आपल्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

आपल्या समाजाचा असा एक अलिखित नियम आहे की काही विषयांवर उघड, मोकळेपणानं बोलायचं नाही. लैंगिकता हा त्यापैकीच एक. याबाबतीत बोलायची वेळ आली तर एक प्रकारचं अवघडलेपण आपल्या सगळ्यांच्याच मनाशी असतं त्यामुळे बोलणं टाळण्याकडे आपला कल असतो. परंतु यामुळेच मुलांची असुरक्षितता वाढते आणि मुलांशी लैंगिक चाळे, त्यांच्यावर लैंगिक अत्याचार असे प्रकार सर्रास आपल्या अवती भवती घडताना दिसतात.

ही पुस्तिका हे अवघडलेपण दूर करण्याची पहिली पायरी आहे. मुलांवरील लैंगिक अत्याचाराबद्दल सर्व काही यात आहे असा आमचा मुळीच दावा नाही. या विषयाची वस्तुनिष्ठपणे ओळख करून घेण्याची ही सुरूवात मात्र निश्चित आहे. या पुस्तिकेमुळे या विषयावर आणखी वाचण्यासाठी, चर्चा करून स्वतःची समज वाढवण्यासाठी प्रोत्साहन मिळावं अशी अपेक्षा आहे.

यातूनच आपण स्वतः मुलांना त्यांच्या सुरक्षिततेबद्दल समजावू शकाल, मुलांबरोबर असं काही घडू नये यासाठी लक्ष देऊ शकाल आणि त्यातूनही काही घडलंच तर त्या मुलांना वेळेवर जरूर तो आधार, मदत देऊ शकाल.

ही पुस्तिका संकलित करताना 'हे सारं मला माहीत हवं!' हे डॉ. अनंत साठे आणि डॉ. शान्ता साठे यांचं पुस्तक, 'एज्युकेशन इन ह्युमन सेक्शुॲलिटी' हे धन पंथकी यांचं पुस्तक, साक्षी या दिल्लीच्या संस्थेची 'चाइल्ड सेक्शुअल ॲब्यूज' ही पुस्तिका तसंच तुलीर या चेन्नाईमध्ये मुलांच्या लैंगिक अत्याचाराच्या प्रश्नावर काम करणा-या संस्थेचं काही साहित्य यांची मदत झाली. या सर्वांचे मनापासून आभार. ही पुस्तिका तयार करताना महिला व बाल विकास विभागाचे पूर्व प्रधान सचिव श्री. उज्ज्वल उके यांची बहुमूल्य मदत झाली. तसेच उपआयुक्त (बाल विकास) श्री. राहुल मोरे, युनिसेफच्या श्रीम. अल्पा व्होरा (बाल संरक्षण विशेतज्ञ), श्री. संतोष शिंदे आणि श्रीम. कामिनी कपाडिया (राज्य सल्लागार, बाल संरक्षण) तसेच फॅक्सेच्या

माझ्या सहकारी श्रीम. संगिता पुणेकर आणि श्रीम. रोशनी नायर यांनी महत्त्वाच्या आणि उपयुक्त सूचना केल्या.

ही पुस्तिका आणि सोबतची पोस्टर्स या माहिती संचाला (रिसोर्स किट) अंतीम स्वरूप देण्यापूर्वी या संचाच्या समालोचनासाठी महिला आणि बाल विकास विभाग युनिसेफ यांनी फॅक्सेच्या सहकार्यानं यशदा-पुणे येथे एक दिवसाची बैठक आयोजित केली होती.

प्रधान सचिव (महिला व बाल विकास विभाग) श्री. उज्वल उके हे अध्यक्ष स्थानी असलेल्या या बैठकीत यशदा आणि आरोग्य विभागाचे प्रतिनिधी, उपायुक्त महिला आणि बालविकास जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी, बालगृहांचे अधिकारी, परिविक्षा अधिकारी, तसंच कायदा समुपदेशक तज्ञ, बाल कल्याण समितीचे सदस्य आणि मुलांच्या लैंगिक शोषणाच्या प्रश्नावर काम करण्याचा अनुभव असलेले स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

या सर्वांनी आपला बहुमूल्य वेळ देवून या माहिती संचाला अंतीम स्वरूप देण्यासाठी जे सहकार्य केले त्यासाठी या सर्वांचेही मनापासून आभार!

आपण सर्वजण मिळून हे जग ही एक सुरक्षित जागा आहे असा विश्वास मुलांना देऊ या.

हे सोपं नाही परंतु आपण सगळ्यांनी मनावर घेतलं तर शक्य नक्कीच आहे.

**विद्या आपटे**

फॅक्से (बाल लैंगिक शोषण विरोधी मंच)

# अनुक्रम


१. मुलांची वाढ ........................................................ १

२. बाल हक्कांची थोडक्यात ओळख (CRC) .......................... ६

३. मुलांवरील अत्याचार - एक अभ्यास ............................... ७

४. लैंगिकता आणि लैंगिक शिक्षण ...................................... ८

५. मुलांना हे माहीत असू द्या .............................................. १०

६. मुलांचे लैंगिक शोषण ............................................... ११

७. मुलांची काळजी घेणा-यांना हे माहीत हवे.......................... १५

८. मुलांचे लैंगिक शोषण आणि कायदा............................... २०
प्रथम माहिती अहवाल (FIR)
बाल कल्याण समिती (CWC)

९. संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मचा-यांनी पाळावयाच्या नियमांचा मसुदा २५

१०. बरोबर की चूक? ................................................ ३०

# १. मुलांची वाढ

जन्माला येऊन वाढत जाणं / मोठं होणं हा एक सुंदर प्रवास आहे. अनेक आश्चर्यांनी, उत्सुकतेनं भरलेला. वयाची वीशी ओलांडेपर्यंत मुलाची शारीरिक वाढ होते, मानसिक बदल येतात आणि गाठीला बरेचसे अनुभवही! या तीन्हीवर वयानुरूप लैंगिकतेचा परिणाम होत असतो.

लैंगिकता हा माणसाच्या जगण्याचा वेगळा करता न येणारा भाग आहे. सर्व माणसांना लैंगिक अवयव असतात, लैंगिक भावना असतात आणि त्या व्यक्त करण्याच्या पध्दती असतात. तसं पाहिलं तर मूल जन्माला आल्यापासून त्याचं लैंगिकते बद्‌दलचं शिक्षण चालूच असतं.

स्वतःला सुरक्षित कसं ठेवायचं हे आपण मुलांना शिकवणार असू तर त्यांच्या वाढीचे ४ टप्पे आधी समजून घेऊ या.

अ) ० ते ३ वर्षं  ब) ४ ते ६ वर्षं  क) ७ ते १० वर्षं  ड) ११ ते १८ वर्षं

## अ) पहिला वयोगट : ० ते ३ वर्षं

या काळात भावनिक व बौध्दिक वाढ प्रचंड प्रमाणात होते. शरीरिक वाढ ही वातावरण व अनुवंशिकतेवर अवलंबून असते. याच काळात मूल अंगावर पीत असल्यानं आई-मुलाचं नातं घट्ट होतं. आईच्या स्पर्शातून मुलाला सुरक्षित वाटतं. भोवतालच्या माणसांमुळे आपण मुलगा किंवा मुलगी आहोत हे मनाशी नक्की होतं. आपल्याला हवं ते मिळायलाच हवं, बस्स! नाहीतर रडून गोंधळ घालायचा असा फक्त स्वतःपुरता विचार करण्याचं हे वय.

खेळताना, झोपताना, अंघोळ करताना मूल स्वतःच्या शरीराची ओळखही करून घेत असतं. इतर अवयवांप्रमाणे ते आपल्या जननेन्द्रियाशी खेळतं. त्यातून त्याला स्पर्शाचा आनंद मिळतो, सुरक्षित वाटतं. मुलाला मुलीच्या आणि मुलीला मुलाच्या शरीराच्या वेगळेपणाबद्दल कुतुहल असतं. या वयापासूनच मोठ्यांकडून मुलांनी कसं वागायचं, मुलींनी कसं वागायचं, काय योग्य काय अयोग्य याची शिकवण सुरू होते.

## ब) दुसरा वयोगटः ४ ते ६ वर्षं

या वयाची मुलं उत्साही आणि धडपडी असतात. हळूहळू सवयीनं आपलं आपण जेवणं, चपला-बूट, कपडे घालणं, बटणं लावणं जमू लागतं, करायला आवडतं. इतर मुलांशी मैत्री होते. मुलं वडिलांचं, आईचं किंवा सहवासातल्या इतर मोठ्यांचं अनुकरण करत वागायला-बोलायला शिकतात. मूल मुकाट्यानं ऐकणारं असेल की दांडगटपणा करणारं, छोट्या छोट्या बाबतीतही आई-वडिलांवर अवलंबून असेल की स्वतन्त्रपणे वागणारं हे पालकांनी किंवा मोठ्या माणसांनी मुलाला कसं वाढवलं यावर अवलंबून असेल. एखाद्याकडे टक लावून पहाणं, कुतुहलापोटी परकर, फ्रॉक किंवा पंचा उचलून डोकावणं असं या वयाची मुलं निरागसपणे करताना दिसतात. हे वागणं योग्य नाही हे मोठ्यांनी न रागावता शिक्षा न करता समजवावं लागतं.

लैंगिक अवयवाशी खेळणं किंवा हस्तमैथुनासारखी कृतीही काही वेळा मुलं करतात. तो स्पर्श आनंद देतो म्हणून ते असतं. प्रौढ माणसाला जशी लैंगिक इच्छा असते त्याचा इथे संबंध नाही.

निरागसता आणि सहज कुणाच्याही आधीन होण्याचं हे वय. या वयोगटातील मुलांबाबत लैंगिक दुर्वर्तनाची शक्यता अधिक असते. असे अनुभव त्यांच्या वाट्याला येऊ नयेत म्हणून त्यांना न घाबरवता व्यवस्थित सूचना दिलेल्या असणं अत्यंत गरजेचं आहे. (तपशिलासाठी पहा प्रकरण ५)

## क) तिसरा वयोगट : ७ ते १० वर्षं

या वयात मुलांची शारीरिक वाढ मुलींच्या तुलनेत मंद असते. या वयात आई-वडील, शिक्षकांनी आपलं कौतुक करावं असं मुलांना वाटतं. मुलगे आणि मुली आपापले गट बनवतात. मुलांनी आणि मुलींनी कसं वागावं,

बोलावं, कपडे करावे याबद्दल साचेबंद कल्पना या वयात मनाशी तयार होतात. लैंगिकतेबद्दल कुतुहल या वयात जागं होतं. पालक किंवा मुलांची काळजी घेणारी माणसं वेळप्रसंग पाहून मुलांशी लैंगिकतेबद्दल मोकळेपणानं बोलतील तर दोघांचं एक मोकळं छान नातं निर्माण होऊ शकतं.

मुलगा आणि मुलगी यांच्यातील शारीरिक वेगळेपण आणि लैंगिक अवयवांची स्वच्छता हेही याच वयात मुलांना शिकवायला हवं. दुस-याच्या शरीराचा, मनाचा आदर करणं हे मोठ्यांच्या वागणुकीतून दिसलं तर मुलं आपोआप शिकतात.

## ड) चौथा वयोगट : ११ ते १८ वर्षं

१० ते १४ म्हणजे कुमार वय आणि १५ ते १८ ही किशोरावस्था. या दोन गटांचा आपण एकत्रित विचार करणार आहोत कारण यातील सीमारेषा अंधूक आहे.

ही मुलं आयुष्याच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर, एका निर्णायक वळणावर उभी असतात. वाढाळू म्हणता येईल अशा अवस्थेत ती असतात. हा त्यांच्या आयुष्यातील कसोटीचा, ताणतणाव जाणवण्याचा काळ असतो. म्हणूनच वाढाळू वयात प्रवेश केला म्हणजे नेमकं काय झालं, काय घडलं, हे कुणीतरी त्यांना समजावणं आणि त्यांनी ते समजून घेणं गरजेचं असतं.

या संक्रमणावस्थेत ब-याच गोष्टी घडून येतात. शारीरिक बदल झपाट्यानं होतात. स्वतःचं शरीर हेच एक आश्र्चर्य वाटायला लागतं. याच काळात लैंगिक प्रेरणा, जाणिवा निर्माण होऊ लागतात. लैंगिक आकर्षण जाणवायला लागतं.

राग -लोभ तीव्र होतात. नेमंक काय होतंय, काय जाणवतंय, हे कळत नाही. पण स्वतःची - आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव व्हायला लागते. मुलामुलींचं स्वतंत्र, संपूर्ण व्यक्तिमत्त्व आकाराला यायला लागतं. नकळत 'स्व'चा शोध घ्यायला सुरुवात होते.

आता वयात येण्याचे म्हणजेच किशोरावस्थेच्या संक्रमणाचे ताणही जाणवायला लागतात, अनुभवाला यायला लागतात. स्वतःमध्ये झपाट्यानं घडून येणा-या शारीरिक, मानसिक, बदलांमुळे मनात अनेक शंका-कुशंका, समज-गैरसमज, आणि भय नि चिंता उत्पन्न होत असतात.

या महत्त्वाच्या पण नाजूक विषयावर कोणाशी बोलावं, कसं बोलावं, हे कळत नाही. कारण या विषयाबद्दल सहसा कोणीही मुलांशी स्वतःहून मोकळेपणानं बोलत नाही. मोठी माणसं 'हे करू नका, ते करू नका', एवढंच सांगतात. पण काय घडतं आहे, का घडतं आहे हे समजावून सांगत नाहीत. मित्रमंडळींकडून मिळवलेली माहिती अनेकदा अपुरी-अशास्त्रीय असते कारण तेही अजाण-अज्ञानी असतात. प्रसारमाध्यमांतून मिळणारी माहिती ही ब-याच वेळेला केवळ अपुरीच नाही तर अतिरंजित आणि अवास्तवही असते, गैरसमज मनातला गोंधळ वाढवणारी असते.या सगळ्याची मुलांना जाणीव करुन देण्याची जशी आवश्यकता असते तसंच या वयात विशेषतः मैदानी खेळांना प्रोत्साहन देणं महत्त्वाचं.

'हे जे भांबावलेपण आहे ते तुमच्या एकट्याचं / एकटीचं नाही. आयुष्याच्या या टप्प्यावर अशी गोंधळलेली अवस्था खूपजणांची होते. तसंच तुम्हाला पडणारे प्रश्न, जाणवणा-या अडचणी तुमच्या एकट्याच्या / एकटीच्या नाहीत. इतरही खूपजणांना त्या जाणवतात. तेव्हा मनावर उगीचच दडपण, ताण घेण्याची गरज नाही.' असं कोणी समजावलं तर ते खूप दिलासा देणारं असतं.

मुलीचं बाईमध्ये आणि मुलाचं पुरुषामध्ये रूपान्तर होण्याचा म्हणजेच संक्रमणाचा हा काळ असतो. या वयाची मुलं खूप संवेदनाक्षम असतात. पटकन राग येणं, टोकाचा आनंद किंवा अकारण खूप उदास वाटणं, कंटाळा येणं, एकटं रहावंसं वाटणं, सगळ्याच गोष्टींबद्दल कमालीचं कुतुहल, अवास्तव आत्मविश्वास किंवा अनिश्चितता ही आणखी काही लक्षणं. बालपण मागे टाकून प्रौढांच्या जगात शिरण्याच्या या काळातही पालक किंवा काळजी घेणा-या प्रौढांनी साथ देणं, समजुतीनं घेणं खूप महत्त्वाचं असतं.

## किशोरवयातील शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदल

किशोर वयात नेमके कोणते शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदल होतात ते प्रथम समजून घेऊ या.

## शारीरिक बदल

१० ते १४ वर्षापर्यंत मुलगा व मुलगी यांची वाढ सारखीच असते. साधारणतः १० ते १२ या वयात हे बदल दिसायला सुरुवात होते. काही मुलींच्या बाबतीत ते उशिराही होऊ शकतात.

| मुलींमधील बदल | मुलांमधील बदल |
|---|---|
| उंची वाढते | उंची वाढते |
| वजन वाढते | वजन वाढते |
| काखेत व जननेंद्रियांवर केस येऊ लागतात | छातीवर, काखेत व जननेंद्रियांवर केस येऊ लागतात |
| चेह-यावर मुरूम व पुटकुळ्या येतात | चेह-यावर मुरूम व पुटकुळ्या येतात |
| नितंब मोठे होऊ लागतात | जननसंस्थेची वाढ होते |
| स्तन हळूहळू मोठे होतात | खांदे रूंद होतात |
| मासिक पाळी सुरू होते | वीर्यपतन होऊ शकतं |
| जननेंद्रियाची वाढ होते | आवाज फुटतो ( सगळ्यांचा फुटतोच असं नाही) |
| | दाढी मिशा येतात |

१४ ते १६ वयामध्ये मुला-मुलींमध्ये लक्षात येण्यासारखे जे शारीरिक बदल घडून येतात त्यांना दुय्यम स्वरूपाचे बदल म्हणतात.

मुलांमध्ये वीर्य निर्मितीला याच काळात सुरूवात होते. त्यांना झोपेमध्ये कधीमधी वीर्यपतनाचा (स्वप्नावस्था) अनुभव येऊ लागतो. शिश्नाला अधून मधून ताठरपणा येतो. ही सारी नैसर्गिक प्रक्रिया असते. त्यामुळे मुलांनी गोंधळून जाण्याचं काहीच कारण नाही. याच काळात मुलाचं रूपांतर हळूहळू पुरुषामध्ये होतं व त्याच्या शरीराला योग्य असा घाट येत असतो.

किशोर अवस्थेतील मुलं भरपूर खेळतील, व्यायाम करतील आणि त्यांना पोषक आहार मिळेल याकडे मोठ्या माणसांनी लक्ष देणं जरूरीचं आहे.

## मानसिक व भावनिक बदल

याच काळात भिन्नलिंगी व्यक्तींचा सहवास हवाहवासा वाटतो. त्यांच्याशी भावनिक जवळीक साधावीशी वाटायला लागते. त्यात कळत नकळत स्पर्शाचीही ओढ वाटणं हे अगदी नैसर्गिक आहे. (काहीजणांना समलिंगी व्यक्तीबद्दलही असं आकर्षण वाटू शकतं आणि तेही नैसर्गिक असतं).

लैंगिक आकर्षण जाणवणं ही एक साहजिक प्रक्रिया आहे. पण याबाबतीत कोणतीही कृती करत असताना एका महत्त्वाच्या गोष्टीचं भान ठेवावं लागतं. ते म्हणजे आपण 'मोठे झालो आहोत' असं वाटत असलं तरी निर्णय घेण्याची क्षमता, निर्णयापाठोपाठ येणारी जबाबदारी समजण्याची क्षमता अजून आलेली नसते.

या वयात लैंगिक प्रेरणा व उर्मी प्रबळ असतात. कामप्रेरणेला बळी पडून समागमाचा - संभोगाचा - प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा, प्रयोग करण्याचा मोह काहींना होतो तर काहींना स्वतःची मर्दानगी (पुरुषत्व) सिद्ध करण्याची गरज भासते. समागम - सुखाच्या मोहानं किंवा एक 'टाईमपास' म्हणून केलेल्या स्वैर लैंगिक संबंधांच्या परिणामांची कल्पना नसते आणि मग त्यातून भलती गुंतागुंत होऊ शकते. यासाठी समवयस्क मुलांचे गट करुन त्यांना बोलतं करणं, मन मोकळं करण्याची संधी देणं महत्त्वाचं.

मर्दानगीच्या चुकीच्या कल्पनांमुळे 'स्त्री'कडे एक खेळणं, एक भोगवस्तू म्हणून पाहण्याची, तिची छेडछाड काढण्यात, तिच्यावर बळजबरी करण्यात आणि असभ्य वर्तन करण्यात पुरुषार्थ मानण्याची चूक काहीजण करतात. वयानुसार योग्य माहिती वेळेवर दिली गेली तर अशा ब-याचशा घटना टळू शकतील.

# २. बाल हक्कांची थोडक्यात ओळख

संयुक्त राष्ट्र परिषदेनं २० नोव्हेंबर, १९८९ साली बालहक्क संहिता मंजूर केली. भारतानं ११ डिसेंबर, १९९२ साली त्यावर सही करून मान्यता दिली. या संहितेच्या व्याख्येनुसार १८ वर्षाखालील व्यक्ती म्हणजे मूल.

ही संहिता म्हणजे मुलांच्या हक्कांची अतिशय काटेकोर आणि योग्य भाषेत केलेली सविस्तर यादी आहे.

ढोबळमानाने ही यादी मुलांचा जगण्याचा हक्क, विकासाचा हक्क, सहभागाचा हक्क आणि सुरक्षिततेचा हक्क अशी चार भागात विभागता येते.

# बाल हक्क संहितेप्रमाणे प्रत्येक मुलाला खालील हक्क आहेत

## जगण्याचा हक्क

- जन्माला येण्याचा, राष्ट्रीयत्त्वाचा, सकस आहार,जरुरीप्रमाणे कपडे आणि निवारा
- समाधानकारक आणि आवश्यक राहणीमान
- उत्कृष्ट आरोग्याचा दर्जा आणि परिणामकारक आरोग्य सेवा
- तो किंवा ती अपंग असेल, तर अशा मुलांसाठी विशेष सेवा, ज्याद्वारे त्यांचा आत्मसन्मान प्रतिष्ठा जोपासली जाईल, ती स्वावलंबी होतील आणि त्यांचा समाजात कार्यक्षम वावर राहील.
- सामाजिक सुरक्षितता आणि बाल सेवा-सुविधा.

## विकासाचा हक्क

- मोफत प्राथमिक शिक्षण
- माध्यमिक शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणाची उपलब्धता
- त्याच्या किंवा तिच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास, उपजत गुण / प्रतिभा आणि मानसिक, शारीरिक कार्यक्षमता पूर्ण करेल असे शिक्षण
- शिक्षण अशा भावनेचं जे समजावेल शांतता / सोशिकता आणि समानता
- खेळ आणि मनोरंजन तसेच सांस्कृतिक आणि कलात्मक कार्यक्रमात भाग घेण्याची संधी
- संधी... त्याच्या किंवा तिच्या संस्कृतीचा आनंद लुटण्याची, त्याच्या किंवा तिच्या धर्माची ऐट मिरवण्याची.

## सहभागाचा हक्क

- मुलांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या सर्व बाबींमध्ये त्याला / तिला आपलं म्हणणं, दृष्टीकोन ऐकविण्याचा आणि इतरांनी ते गंभीरपणे विचारात घेतलं जाण्याचा हक्क
- अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क
- विचार सद्सद्विवेक बुध्दी आणि धर्माचं स्वातंत्र्य
- एकत्र येण्याचं आणि शांतता सभा घेण्याचं स्वातंत्र्य
- विविध स्त्रोतांकडून माहिती मिळवण्याचं स्वातंत्र्य.

## सुरक्षिततेचा हक्क

- गंभीर परिस्थितीत - जसं जातीय दंगल, युध्दासारखा संघर्ष किंवा जेव्हा मुलं आपल्या कुटुंबापासून किंवा घरापासून दूर होतात
- जेव्हा तो किंवा ती कायद्याच्या विरूध्द जातात किंवा कायद्याच्या कचाट्यात सापडतात
- शोषणाच्या स्थितीत जसं बालमजुरी ... अमली पदार्थांचा गैरवापर, लैंगिक शोषण किंवा निंदा, विक्री, अपहरण
- इतर कोणत्याही प्रकारचा भेदभाव.

**जगण्यासाठी, सर्वांगिण विकासासाठी मुलाच्या आयुष्यावर परिणाम करणा-या निर्णय प्रक्रियेत समजून उमजून सहभागी होण्यासाठी सर्व प्रथम गरज आहे ती मुलानं सुरक्षित असण्याची, त्याला सुरक्षित वाटण्याची. इथं आपण मुलांच्या सुरक्षिततेच्या हक्काबद्दल अधिक माहिती करून घेणार आहोत.**

# ३. मुलांवरील अत्याचार - एक अभ्यास

**भारताच्या महिला आणि बाल विकास खात्याने २००७ मध्ये 'मुलांवरील अत्याचार' या विषयावर १३ राज्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या मदतीनं १७२२० मुलांचा एक अभ्यास केला. त्या अभ्यासाचे निष्कर्ष विचार करायला लावणारे आहेत. यातल्या मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या संदर्भातील महत्त्वाची आकडेवारी अशी आहेः**

- कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या लैंगिक अत्याचाराला बळी पडलेली मुले - ५३%
- गंभीर स्वरुपाचे लैंगिक अत्याचार सोसावे लागलेली मुले - २२ %
- आंध्र प्रदेश, आसाम, बिहार आणि दिल्ली या राज्यातलं या गुन्ह्यांचं प्रमाण सर्वाधिक
- लैंगिक अत्याचार वाट्याला येणारी सर्वाधिक मुलं ही रस्त्यावर रहाणारी, मोलमजुरी करणारी किंवा संस्थांमध्ये रहाणारी आहेत असं आढळून आलं आहे.

हा अभ्यास मुख्यतः वंचित गटातील मुलांचा आहे ही मर्यादा लक्षात घेतली तरीही ही आकडेवारी धक्कादायक आहे. या प्रश्नाचं गांभीर्य आणि मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं ठोस पावलं उचलण्याची आणि आपण सर्वांनी कसून प्रयत्न करण्याची किती निकड आहे हे लक्षात आणून देणारी आहे.

# ४. लैंगिकता आणि लैंगिक शिक्षण

## लैंगिकता म्हणजे काय?

> जन्मापासून वयात येण्यापर्यंत आपल्या शरीरात, मनात होणारे बदल समजून घेणं

> शारीरिक आकर्षण आणि वयात येणं

> स्वतःची ओळख

> भिन्न लिंगी व्यक्तीची ओळख

विश्वास आणि आदर हे लैंगिकतेपासून वेगळे करता येत नाहीत. कारण लैंगिक सुख घेण्याचा परिणाम गर्भधारणेत होऊ शकतो. मुलाला वाढवण्याची जबाबदारी त्यातूनच येत असते. मुलांवरील लैंगिक अत्याचारात नेमका याचाच अभाव असतो. मुलाचा वस्तूसारखा वापर केला जातो.

लैंगिकता, लैंगिक भावना ही सर्व माणसात सारखीच आहे. त्याबद्दल जाणून घेणं, योग्य रीतीनं तो आनंद घेणं हे स्वाभाविक आहे याची जाणीव, याबद्दलची माहिती मुलांना योग्य वेळी योग्य पध्दतीनं दिली तर ती नक्कीच दिलासा देणारी असेल.

### लैंगिक शिक्षण

मूल जन्माला येतं तेच सहसा मुलगी किंवा मुलगा म्हणून. जन्मल्यापासून मरेपर्यंत 'लैंगिकता' व 'स्पर्शसुख' प्रत्येकाच्या सोबत असतं. त्यामुळेच लैंगिकता समजून घेण्यात गैर काहीच नाही. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावरचं लैंगिकतेचं बदलतं स्वरूप समजून घेणं, अनुभवणं ही आयुष्यभर चालू राहाणारी प्रक्रिया आहे हे बहुतेक वेळा लक्षातच घेतलं जात नाही. 'लैंगिक शिक्षण' म्हणजे समागमाचं शिक्षण, माहिती देणं असा संकुचित, मर्यादित अर्थ घेतला जातो आणि मग पाठोपाठ त्याबद्दलचे आक्षेप येतात. हे

चुकीचं आहे.

'लैंगिक' या शब्दालाच काही मंडळींचा विरोध असेल तर शिक्षणासोबत तो जोडूया नको.परंतु या शिक्षणाला नाव काही दिलं तरी त्याचं व्यापक स्वरूप समजून घ्यावं / द्यावं लागेल.मुलांना, तारूण्यात पदार्पण करणा-यांना जे माहीत असणं गरजेचं आहे, ज्यामुळे त्यांचं पुढचं, जोडीदाराबरोबरचं आयुष्य सुखासमाधानाचं होऊ शकेल अशा माहितीचा अंर्तभाव त्यात  असावा लागेल.

हळूहळू का होईना पण 'लैंगिकता' ही आपल्या आयुष्यातल्या मूलभूत गोष्टींपैकी एक गोष्ट आहे आणि ती समजून घेतली पाहिजे याची जाणीव लोकांना होते आहे असं दिसतं. मुलांना लैंगिकतेबाबत योग्य प्रकारे योग्य ती माहिती देणं अनिवार्य आहे हे जितकं खरं तितकंच हा अतिशय नाजूक आणि गुंतागुंतीचा विषय असल्यामुळे या विषयावर त्यांच्याशी संवाद साधणं सोपं नाही हेही खरं आहे.

ज्या त्या समाजातील सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, आणि राजकीय भूमिका, समजुती, चालीरीती, रूढी परंपरा यांचंही भान हे शिक्षण देताना ठेवणं गरजेचं आहे. पण असे बरेच अडसर आहेत म्हणून ते 'नकोच' असं त्याचं उत्तर असू शकत नाही. अशा पध्दतीनं लैंगिकता आयुष्यापासून वेगळी करता येत नाही.

**विशेष गरजा असलेल्या मुलांनाही लैंगिक भावना असतात हे समजून घेणं गरजेचं आहे.म्हणूनच विशेष गरजा असलेल्या किंवा नसलेल्या सर्वच मुलांना त्यांचं वय, समज याच्या योग्य लैंगिक शिक्षण देत रहाणं गरजेचं आहे. त्यामुळे नैसर्गिक बदल, भावना, उर्मी याबद्दल चुकीच्या कल्पना नसतील, अकारण भीती वाटणार नाही.**

**सर्वच मुलांना जर योग्य ते लैंगिक शिक्षण दिलं तर लैंगिक अत्याचार, लैंगिक रोग किंवा अकाली गरोदरपण या प्रकारांची शक्यता कमी संभवते. अनेकदा हे शिक्षण विशेष गरजा असलेल्या मुलांना देण्याची गरज आहे असं पालक, शिक्षकांच्या लक्षात यत नाही तर कधी ते या मुलांना समजेल अशा भाषेत कसं द्यावं ही अडचण येते म्हणून त्याबद्दल काही केलं जात नाही.**

# लैंगिक शिक्षणात काय असावं

> प्रजनन संस्था, तिचं कार्य

> वयात येताना होणारे शारीरिक, भावनिक, मानसिक बदल - वागणुकीतील बदल

> प्रेम - मैत्री - आकर्षण या बद्दल माहिती

> हस्तमैथून- समज / अपसमज

> लैंगिक अवयवांची स्वच्छता

> समाजात नाती कशी निर्माण होतात - ती अधिक मजबूत करण्यासाठी ,टिकवण्यासाठी आत्मसात करण्याच्या कला किंवा कसब

> नात्यामध्ये बेबनाव झाला किंवा दुसऱ्या व्यक्तीला ते नको असेल तर ते समजून घेता येणं

> नात्यामध्ये नकार घेता येणं

> नातेसंबंधांमध्ये आदर, जबाबदारीची जाणीव

> लैंगिक भावना प्रकट करण्याच्या योग्य पध्दती

> लैंगिक संबंध, नातं आणि लग्न यातून येणा-या जबाबदा-या

> लैंगिक संबंधातून उद्‌भवणारे शारीरिक आणि मानसिक परिणाम

> गर्भ निरोधकांबद्‌दल माहिती देणे

> सुरक्षित समागम

> समलिंगी नातेसंबंध

> काळजी घेऊनही लैंगिक अत्याचार झालाच तर कुणाची मदत घेता येऊ शकेल या विषयी माहिती.

> लैंगिक अत्याचार. अर्थात वयानुरूप यातलं केव्हा काय मुलांना सांगायचं हे माहीत असणं अत्यंत महत्त्वाचं आहे.

# ५. मुलांना हे माहीत असू द्या

१. **शरीर -** आपलं शरीर हे आपल्या मालकीचं असतं त्याला इजा करण्याचा अधिकार कुणालाही नाही.

२. **कोण स्पर्श करू शकतं -** लहान असताना अंघोळीसाठी कुणा मोठ्या माणसानं मदत करणं किंवा आजारपणात डॉक्टरांनी केलेला स्पर्श...एरवी कुणी कपड्यानं झाकल्या जाणाऱ्या अंगाला स्पर्श करू पाहील तर ते बरोबर नाही.

३. **तक्रार करायची -** एखाद्याच्या स्पर्शाचा राग आला किंवा विचित्र वाटलं तर लगेचच आपुलकीच्या, विश्वासातल्या माणसाला जाऊन सांगायचं.

४.**गुपित -** कुणीही स्पर्शाचे नियम तोडून म्हणेल 'हे आपलं तुपलं गुपित आहे.कुणाला सांगायचं नाही' तरी सुध्दा विश्वासातल्या माणसाला नक्की सांगायचं.

५. **उशीर झाला तरी सांगायचं.** हवी ती मदत मिळेपर्यंत सांगत रहायचं.

६. **नाही / नको -** आपल्याला आवडणार नाही, भीती वाटेल असा कुणी स्पर्श केला तर जोरात ओरडायचं 'नाही' 'नको'.

७. **भेटवस्तू -** कधी खाऊ / भेटवस्तू देऊन त्या बदल्यात काही लोकं आपल्याला त्रास होईल असं वागतात, बोलतात, स्पर्श करतात. त्यांचं मुळीच ऐकायचं नाही की भेटवस्तू घ्यायची नाही.

८. **चूक आपली नाहीच -** आपण काळजी घेऊनही काही घडलंच तर यात आपली चूक नाही.स्पर्शाचे नियम तोडून कुणी इजा केली तरीही. नाही / नको म्हणू शकलो नाही तरीही. तिथून निघून जाणं जमलं नाही तरीही. जे घडलं ते आपल्याला हवं होतं असा याचा अर्थ मुळीच होत नाही. पण नाही नको म्हणता यायला हवं, त्याचा सराव करायला हवा.

९. **लक्षात ठेवायचं -** आपण महत्त्वाचे आहोतच त्यातही सुरक्षित असणं आणखी महत्त्वाचं.

१०. **समान हक्क -** काही कमतरता किंवा अपंगत्व असलेल्या मुलालाही आपल्या सारखेच सर्व हक्क असतात - आनंद, सुख घेणं, माहिती, मनोरंजन, करमणूक इ. हेही लक्षात ठेवायला हवं.

# ६. मुलांचे लैंगिक शोषण

## मुलांशी लैंगिक दुर्वर्तन / मुलांवरील लैंगिक अत्याचार / मुलांचे लैंगिक शोषण

**सोपी व्याख्या अशीः मुलाशी अगर मुलीशी लैंगिक भावनेनं केलेलं कोणतंही कृत्य म्हणजे लैंगिक दुर्वर्तन किंवा लैंगिक अत्याचार होय. सहसा त्या व्यक्तीचा मुलावर अधिकार असतो किंवा ती व्यक्ती मुलाच्या विश्वासातली असते. अनेकदा विश्वास आणि अधिकार दोन्हीही असू शकतात. (पुढे कायदा समजून घेताना आपण याचा तपशिलात विचार करणार आहोत.)**

### वस्तुस्थिती काय सांगते

१) लैंगिक अत्याचाराचा बळी मुलगा किंवा मुलगी कोणीही असू शकतं. तसंच तो किंवा ती कोणत्याही सामजिक, आर्थिक गटातील असू शकतात.

२) अभ्यासानुसार ४ पैकी २ मुली व ६ पैकी १ मुलगा लैंगिक अत्याचाराचे बळी ठरतात. (साक्षी २००४)

३) अभ्यासात असंही आढळलं की ९० टक्के अत्याचारी हे बळी पडलेल्या मुलाचे मित्र, नातेवाईक अथवा ओळखीचे असतात.

४) मोठ्या व्यक्तीवरील बलात्काराच्या तुलनेत बाल लैंगिक अत्याचार हा वारंवार घडणारा गुन्हा आहे. याचं कारण म्हणजे बाल लैंगिक अत्याचारातील आरोपी हा ओळखीची व्यक्ती, मित्र किंवा नातेवाईक असल्यानं तो मुलांच्या कायम संपर्कात असतो. वेळोवेळी निर्माण होणा-या परिस्थितीचा, संधीचा आणि मुख्यतः मुलाच्या निरागसतेचा फायदा घेऊन ती व्यक्ती हे घृणास्पद कृत्य करीत असते.

५) अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाल लैंगिक अत्याचार म्हणजे केवळ संभोग नसून त्याचे इतरही अनेक प्रकार आहेत.

६) अत्याचार करणारी व्यक्ती पुरुष किंवा स्त्री कोणीही असू शकते.

## मुलांवरील लैंगिक अत्याचाराचे प्रकार

| स्पर्शाद्वारे अत्याचार | स्पर्शाशिवायचे अत्याचार |
|---|---|
| मुलांच्या लैंगिक अवयवाला स्पर्श करणे किंवा हाताळणे / मुलाला आपल्या लैंगिक अवयवाला स्पर्श करण्यासाठी प्रवृत्त करणे | प्रौढ व्यक्तीने स्वतःच्या लैंगिक अवयवांचे प्रदर्शन करणे किंवा मुलाला तसे करायला लावणे |
| प्रौढ व्यक्तीने मुलाशी मुख, गुदा किंवा यौनिक संभोग करणे किंवा तसे करण्यास मुलाला प्रवृत्त करणे | प्रौढ व्यक्तीने मुलाला उद्देशून सूचक लैंगिक हावभाव करणे किंवा लैंगिक भाषा वापरणे |
| गुद्द्वारात / योनीमार्गात बोटे अथवा वस्तू घालणे | प्रौढ व्यक्तीने मुलाला अश्लील साहित्य वा चित्र दाखवणे, इंटरनेट द्वारे त्या प्रकारचे साहित्य-संदेश पाठवणे किंवा मुलाला तशी कृती करायला लावणे / मुलाचे त्या अवस्थेतले फोटो घेणे किंवा छायाचित्रण करणे |
| मुलाचे हस्तमैथून करणे किंवा मुलाकडून हस्तमैथून करून घेणे | लैंगिक कृतीच्या बदल्यात पैसे, भेटवस्तू अथवा इतर बक्षिसांचे आमिष दाखविणे |

सर्वसाधारण अशी समजूत असते की परका, अनोळखी माणूस, मनःस्वास्थ्य गमावलेला माणूस मुलांवर लैंगिक अत्याचारासारखं अमानुष कृत्य करतो. दुर्दैवानं वस्तुस्थिती याच्या उलट आहे.

## मुले अशा अनुभवाबद्दल बोलत का नाहीत?

सामान्यतः मुले भीती किंवा लाजेपोटी त्यांच्याशी झालेल्या, होत असलेल्या लैंगिक अत्याचाराबद्दल मोकळेपणानं बोलत नाहीत. अत्याचार करणा-यानं गुप्तता पाळायला सांगितली म्हणून तर कधी कुटुंबच बोलण्यापासून थांबवतं म्हणून.

- जे झालं त्याबद्दल बोलायचं नाही, लपवायचं, याचा अर्थ आपलंच चुकलं असणार असं वाटून स्वतःला दोषी समजणं
- घरात, संस्थेत किंवा भोवतालच्या वातावरणात मोकळा संवाद नसणं
- कोणीही विश्वास ठेवणार नाही, ओरडतील मारतील ही भीती
- आपण सर्वांचे नावडते होऊ ही भीती
- अत्याचार करणा-या बरोबरचं चांगलं नातंही तुटेल ही धास्ती
- अत्याचार करणाऱ्याची भीती / धमक्यांमुळे घाबरणं
- कुणाशी विश्वासानं बोलावं हे न कळणं
- काय घडलं ते कसं सांगावं हे समजत नाही. नेमके शब्द माहीत नसतात
- संस्था / घराच्या इभ्रतीला / प्रतिष्ठेला मुलांच्या सुरक्षिततेपेक्षा अधिक महत्त्व
- प्रकरण पोलिसांपर्यंत जाईल याची भीती

## अत्याचार झालेल्या मुलामध्ये आढळणारी लक्षणं

पालक, शिक्षक, कार्यकर्ते, बालगृहातील कर्मचारी आणि इतरही मुलांच्या संदर्भातील महत्त्वाच्या व्यक्तींना मुलांवरील शारीरिक मानसिक किंवा लैंगिक अत्याचाराची लक्षणं ओळखता येणं, समजणं हे फार गरजेचं आणि महत्त्वाचं आहे.

## वर्तणूक आणि भावनिक लक्षणं

- स्वतःत हरवणं, एकटं एकटं राहाणं
- नखं कुरतडणं
- उदासीनता, चिंताग्रस्त होणं
- अचानक वागणुकीत बदल
- अत्याचार करणारी व्यक्ती जवळपास नसतानाही तिला पाहिल्याचा भास होणं
- काहीतरी वाईट घडणार आहे असं वाटून सतत धास्तावल्यासारखं असणं
- स्वतःविषयी घृणा वाटणं
- आत्मविश्वास कमी होणं
- सहज मैत्री करू न शकणं
- मोठ्या माणसांविषयी अविश्वास
- अचानक एखादी विशिष्ट व्यक्ती, वस्तू किंवा जागा टाळणं किंवा तिची अवास्तव भीती वाटणं
- अभ्यासात मन न लागणं, अभ्यासातील प्रगती घसरणं

- मन एकाग्र करता न येणं
- झोपेत दचकून उठणं, ओरडणं, अत्याचाराबद्दल ची घाबरवणारी स्वप्नं पडणं
- आक्रमक होणं
- भूक जाणं किंवा अती खाणं
- अचानक लैंगिक शब्दांचा, भाषेचा वापर करणं
- इतर मुलांसोबत लैंगिक व्यवहाराचा प्रयत्न करणं
- पळून जाणं
- आत्महत्येचा प्रयत्न करणं
- व्यसनाधीन होणं
- भावनाहीन होणं
- अकाली हस्तमैथून, मुखमैथून, समलिंगी संभोग, अशा सवयी लागणं

## शारीरिक लक्षणं

- वारंवार लघवी होणं किंवा झोपेत बिछाना ओला करणं
- मुलींच्या बाबतीत योनीपटल फाटणं
- गळा, तोंड, गुदा, जननेंद्रियं या अवयवात जळजळ होणं, फोड येणं, सूज येणं
- लैंगिक आजार (गुप्तरोग) होणं, एच् आय् व्ही, संसर्गाची शक्यता
- मुलींच्या बाबतीत अनपेक्षित गरोदरपण

**शारीरिक लक्षणातील शेवटची दोन लक्षणे वगळता एखादेच लक्षण दिसल्यास तो लैंगिक अत्याचाराचा पुरावा होऊ शकत नाही. कारण ही लक्षणे इतर मानसिक भावनिक अस्वस्थतेमुळे किंवा शारीरिक कारणानेही असू शकतात. त्यामुळे घाईने लैंगिक अत्याचाराच्या निष्कर्षाला येणे योग्य होणार नाही परंतु नेमके कारण समजून घेण्यासाठी, योग्य उपचारासाठी समुपदेशकाची मदत घेणे गरजेचे.**

**एकच लक्षण किंवा वेगवेगळी लक्षणे पुन्हा पुन्हा दिसली तर अत्याचाराची शक्यता काळजीपूर्वक पडताळून पहायला हवी.**

**मुलाला पोषक, मोकळे वातावरण आणि योग्य ती मदत वेळेवर मिळाली तर मूल या अत्याचाराच्या परिणामातून पूर्णपणे बाहेर येऊ शकते हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.**

## दीर्घकालीन परिणाम

**मुलावर लैंगिक अत्याचार होत राहिला, त्याला वेळेवर मदत मिळाली नाही तर त्याच्या व्यक्तीमत्त्वावरचे परिणाम प्रौढपणीही दिसतात.**

- कोवळ्या वयात विश्वासाला तडा गेल्यामुळे मित्रमैत्रिणी, सहकारी किंवा इतर निकोप नातेसंबंध जोडण्यात, टिकविण्यात अडचणी.

- आत्मविश्वासाच्या अभावामुळे स्वतःच्या क्षमतेनुसार कामाच्या ठिकाणी किंवा इतरही क्षेत्रात प्रगती करू न शकणं.

- वैवाहिक संबंधात / जीवनात अडचणी.

- स्वतःच्या मुलांची अवास्तव काळजी घेणं, त्यांना सर्वांगिण विकासासाठी जरुर ती मोकळीक न देणं.

- मानसिक आजार उदा. नैराश्य.

- लैंगिक शोषण अनुभवलेले मूल प्रौढपणी इतर मुलांसोबत असे वागण्याची शक्यता असते.

**यासाठी वेळेवर काळजी घेतली जाणं महत्त्वाचं. अत्याचार झालेल्या मुलाला वेळीच योग्य ती मदत मिळाली तर दीर्घकालीन परिणाम टळू शकतात.**

# ७. मुलांची काळजी घेणा-यांना हे माहीत असायला हवं

• समाजमान्य अशी लैंगिक अवयवांची नावं मुलांना शिकवणं गरजेचं आहे. त्याचबरोबर मुलं आपसात लैंगिक संदर्भात कोणते शब्द वापरतात हे आपल्याला माहीत हवं.

• लैंगिकतेशी संबंधित मुलांचे प्रश्न इतर प्रश्न हाताळतो त्याच पध्दतीनं हाताळायला हवेत. म्हणजे गैरवाजवी किंवा अवास्तव महत्त्व देऊ नये किंवा दुर्लक्षही करू नये.

• भाषा हे फार प्रभावी आणि दुधारी शस्त्र आहे. काहीवेळा नकळत आपण 'अर्धवट' किंवा 'मेंटल' अशासारखे काही शब्द वापरतो.ते शब्द ज्याला उद्देशून आहेत त्याच्यावर होणाऱ्या मानसिक परिणामाचं भान असायला हवं. हे मुलांच्याही मनावर बिंबवायला हवं.

• प्रत्येक मूल वेगळं असतं त्यामुळे त्यांचे प्रश्न सरधोपट मार्गानं सोडवता येणार नाहीत. प्रत्येक मुलाचा / केसचा स्वतन्त्र, सर्वांगिण विचार करूनच मार्ग शोधावा लागेल. हे खरं तर सर्वसाधारण मुलांबद्दल ही खरं आहे कारण प्रत्येक मूल हे निसर्गतः वेगळे असतं, वैशिष्ठ्यपूर्ण असतं.

• एखाद्या प्रकारची कमतरता किंवा अपंगत्व असलेल्या मुलालाही इतरांसारखेच सर्व हक्क असतात - आनंद, सुख घेणे, माहिती, मनोरंजन, करमणूक इत्यादी.

• वयात येणाऱ्या मुलांबरोबर मोकळा संवाद असणं महत्वाचं. कोणत्याही विषयावर तुमच्याशी बोलायला त्यांना मोकळेपणा वाटायला हवा.

• जेव्हा एखादी अनोळखी / ओळखीची व्यक्ती मुलांकडे जरा जास्तच लक्ष देते असं वाटेल तेव्हा त्याचं कारण शोधा. प्रौढ व्यक्ती किंवा मोठी मुलं जेव्हा छोट्या मुलांबरोबर एकांतात वेळ घालवतात त्यावेळी याबद्दल ची कारणं समजून घ्या / विचारा / लक्ष असू द्या.
• मुलांना मिळणा-या भेटवस्तू किंवा पैसे याबद्दल सतर्क रहा. या वस्तू कोणी व का दिल्या याबद्दल चौकशी करा. अशा भेटवस्तू घेण्यातील धोके मुलाला समजावून सांगा.

**जर मुलांवर लैंगिक अत्याचार झाला असेल तर.......**

## १. मुलावर विश्वास ठेवा

लैंगिक अत्याचाराबाबत मुलं सहसा खोटं बोलत नाहीत. कोणत्याही परिस्थितीत शहानिशा करण्यासाठी मुलाला अत्याचारी व्यक्तीसमोर नेऊ नका.

## २. शांत रहा

घाबरून, गोंधळून जाऊ नका. अत्याचार करणारी व्यक्ती तुमच्या विश्‍वासातील असेल तेव्हा धक्का, भीती, राग, लज्जास्पद वाटणं आणि अविश्वास ह्या लगेचच व्यक्त होणा-या सहाजिक भावना आहेत. परंतु ह्या भावना चेह-यावर दिसू देऊ नका. तुमचा राग किंवा इतर भावना त्या मुलासमोर दाखवू नका. आपल्यामुळे इतरांना त्रास होतो आहे या भावनेनं मूल तुम्हाला झालेल्या अत्याचाराबद्दल मोकळेपणानं सांगणार नाही.

## ३. जर अत्याचार होऊन बराच काळ गेला असेल, तर 'तू मला आधी का नाही सांगितलंस?' असं विचारू नका. प्रश्नांचा भडिमार करु नका

गुन्हेगार हा परिस्थिती स्वतःला हवी तशी फिरविण्यात कुशल असतो. मुलांनी कोणालाही सांगू नये यासाठी घाबरवण्यात आलेलं असू शकतं. किंवा लाज, संकोच, स्वतःला दोषी समजणं किंवा साधं कसं सांगावं हे न कळल्यानंही मूल गप्प राहू शकतं. अशावेळी मुलाला समजून घेतलं जाण्याची, आधाराची गरज असते. त्याला पटवून द्यायला हवं की त्याचं काही चुकलेलं नाही आणि तुम्ही त्याच्या सोबत ठाम आहात, त्याच्या सुरक्षिततेची काळजी घेणार आहात.

## ४. ओरडू नका किंवा शिक्षा करु नका

कितीही सावधगिरीच्या सूचना दिलेल्या असल्या आणि तरी मुलाकडून जर चूक झाली असेल तर त्याच्यावर ओरडण्याची किंवा त्याला शिक्षा करण्याची ही वेळ नव्हे हे लक्षात असू द्या. तुमची आज्ञा पाळली नाही म्हणून त्याच्यावर राग व्यक्त करू नका किंवा शिक्षा करू नका. अत्याचारमुळे मुलावर आधीच मानसिक आघात झालेला असतो. त्यामुळे तुमच्या आधाराची गरज आहे याचे भान असू द्या.

## ५. मुलाला पुन्हा एकदा विश्वास द्या

लहान मुलं अशा परिस्थितीत गोंधळतात किंवा स्वतःला दोषी ठरवतात. 'हे तू मला सांगितलंस त्याबद्दल मला तुझा अभिमान आहे. हे सर्व सांगायला धैर्य लागतं. यात तुझा काहीही दोष नाही आणि आम्ही सदैव तुझ्या सोबत आहोत.' अशा प्रकारे त्याला धीर द्या. विश्वास वाटू द्या.

## ६. अवास्तव महत्त्व नको

जरूर ती काळजी घ्या पण घटनेला अवास्तव महत्व देऊ नका. मुलाला एरवी इतर मुलांपेक्षा वेगळं वागवू नका.

## ७. या संदर्भातील माहिती संबंधित व आवश्यक त्या व्यक्तींनाच द्या

लैंगिक अत्याचार झालेली मुलं भोवतालच्यांकडून येणा-या प्रतिक्रियांबाबत फार हळवी असतात. वेळोवेळी इतर मुलांसमोर त्या घटनेचा उल्लेखही मुलाला अपायकारक ठरू शकतो.

## ८. वैद्यकीय चाचणी

जरूर तेव्हा ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या आणि तात्काळ लैंगिक अत्याचार कागदोपत्री दाखल करा. वैद्यकीय तपासणीचे, उपचाराचे कागदपत्र जपून ठेवा. गुन्हा दाखल झाला तर गुन्हेगाराला शिक्षा होण्यासाठी हे फार उपयोगाचं असतं.

## ९. मदत मागा

अशा प्रकारच्या लैंगिक अत्याचाराला तोंड देण्याची भावनिक क्षमता मुलांमध्ये नसते. जरूर तेव्हा समुपदेशक किंवा सामाजिक कायकर्त्याची मदत घेण्यात गैर काहीच नाही.

## १०. अतिशय महत्वाचं

मुलाबरोबरचा या बाबतीतला संवाद तुटू देऊ नका, तो मोकळाच ठेवा. मूल हे बळी ठरलेलं आहे आणि अत्याचारी हा गुन्हेगार आहे हे कायम ध्यानात असू द्या.

## मुलांशी संवाद व संपर्क साधणाऱ्या व्यक्तींनी लक्षात ठेवायच्या काही गोष्टी

- मुलाला गुन्हेगार म्हणून वागवू नये.
- तुमच्याकडे आलेल्या मुलाला बोलतं करताना सबुरीनं घ्यायला हवं.
- मुलाला बोलतं करतानाची जागा व भोवतालचं वातावरण विचारात घ्या.
- कामाच्या घाईत मुलाची अपुरी वाक्यं पूरी करू नका.
- उत्तरं सुचवणारे प्रश्न टाळा.
- आपल्याकडे आलेल्या मुलाच्या संदर्भात लैंगिक अत्याचाराची शक्यता मुलावर दडपण येऊ न देता पडताळून पहा.
- मुलाला मोकळं वाटेल, धाक वाटणार नाही अशा पद्धतीनं संवाद साधायला हवा.
- भीतीपोटी मूल सुरूवातीला सर्व खरं सांगणार नाही. आपण आपल्या वागण्यातून त्याच्या मनात विश्‍वास निर्माण करायला हवा.
- मुलाच्या उपस्थितीत आपलं इतरांशीही वागणं-बोलणं मुलाच्या मनात विश्‍वास निर्माण करणारं असावं.
- मुलानं केलेला गुन्हा किंवा घडलेल्या घटनेच्या परिणामांविषयी त्याला घाबरवू नये.
- मुलाला असा विश्‍वास द्या की झाल्या प्रकारात दोष त्याचा नसून करणा-याचा आहे आणि असे अनुभव अनेकांना येतात.
- मुलाच्या उपस्थितीत त्याच्या केसबाबत सहकाऱ्यांशी किंवा इतरांशी चर्चा करू नका.
- तपशील गोळा करताना नेमके शब्द माहीत नसणं हा अडसर दूर करण्यासाठी मदत द्यायला हवी.
- त्याची भाषा आपल्याला किंवा आपली त्याला येत नसेल तर योग्य माणसाची मदत घ्यावी, अंदाजावर अवलंबून राहू नये.
- मूल लैंगिक अत्याचाराबद्दल बोलू पाहील तर गोंधळून न जाता त्याचं म्हणणं नीट ऐकून, समजून घ्यावं. मुलाचेच शब्द वापरून मधून मधून त्याचं म्हणणं आपल्याला बरोबर समजल्याची खात्री करूनच पुढे जावं.
- ''हे आधीच का सांगितलं नाहीस?'' किंवा ''तू अमूक का केलं नाहीस, करायला हवं होतंस'' अशी विधानं टाळावीत.

- आपल्या वागण्या बोलण्यातून 'जे झालं त्याला तूच जबाबदार आहेस' अशी मुलाची समजूत होणार नाही याची काळजी घ्यावी. एरवी मूल बोलणार नाही.

- ज्या माहितीचा मुलाला मदत करण्यासाठी उपयोग होणार नाही त्याबाबत प्रश्न विचारण्याचा मोह टाळा. अनेकदा असे प्रश्न आपलं कुतुहल शमवण्यासाठी असू शकतात.

- मुलाकडून मिळालेल्या माहितीची नोंद ठेवा व ती पुढील तपास करणा-या अधिकाऱ्याला द्या. नोंद करताना तपशिलवार करा. उदा. तारीख, वार, वेळ, जागा, हावभाव, मुलाची किंवा आरोपीची देहबोली, मुलानं किवा संशयित माणसानं वापरलेल्या नेमक्या भाषेतच नोंद करा.

- संपर्कात आलेल्या मुलाची सर्वांगिण पार्श्वभूमी जाणून घेणं महत्त्वाचं आहे.

- मुलाला स्पर्श करताना खूप काळजी घेणं गरजेचं आहे.

- अत्याचारित मूल स्त्री कार्यकर्तीशी मोकळेपणानं बोलेल की पुरूष कार्यकर्त्याशी हे मुलाच्या पूर्वानुभवावर आणि व्यक्तिमत्वावर अवलंबून असतं. अशा परिस्थितीत मूल आपल्याशी मोकळेपणानं बोलत नाही असं लक्षात आलं तर तो मानापमानाचा, जिद्दीचा मुद्दा न करता योग्य अशा कायकर्तीकडे किंवा कार्यकर्त्याकडे केस हस्तांतरित करावी.

- मुलाला व्यक्ती म्हणून सन्मानाची वागणूक देणं गरजेचं आहे. तो त्याचा हक्क आहे.

- लैंगिक शोषण झालेल्या मुलाची माहिती गुप्त ठेवावी. त्याच बरोबर योग्य त्या व्यक्तीची मदत घेताना जवळची माहिती सांगावी लागेल याची मुलाला कल्पना द्यायला हवी.

- आपण काय करणार आहोत, कुठे जाणार आहोत, कशासाठी याची मुलाला समजेल अशा भाषेत कल्पना द्यायला हवी (उदा. पोलीस चौकीवर, डॉक्टरांकडे, समुपदेशकाकडे किंवा इतर कोणाकडे मदतीसाठी मुलाला नेण्यापूर्वी).

- मुलाच्या किंवा केसच्या संदर्भात कोणताही निर्णय घेताना शक्यतो मूल आणि कुटुंबियांना सहभागी करून घ्यावं.

- केस दाखल करायची म्हणजे काय होऊ शकतं, काय नाही याबद्दल ची माहिती अत्याचार झालेल्या मुलाला आणि त्याच्या कुटुंबियांना नीट समजावून त्यांची मानसिक तयारी करून घेणं गरजेचं आहे.

- मुलाचं हित हे आपलं लक्ष्य असलं पाहिजे आणि आपले सर्व प्रयत्न, कारवाई त्या दृष्टीनं होईल याची काळजी घ्यायला हवी.

- क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या १५४ या कलमाप्रमाणे प्रथम माहिती अहवाल (फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट) नोंदवला जातो. म्हणजेच गुन्हा घडल्याची पोलिस स्टेशनवर जाऊन केलेली नोंद. एफ् आय् आर नोंदवल्याखेरीज पोलीस तपास सुरू होऊ शकत नाही हे सर्वांना माहीत असायला हवं.

# ८. मुलांचे लैंगिक शोषण आणि कायदा

सरकार, समाज आणि कुटुंबाकडून कळत नकळत मुलांच्या हक्कांचं उल्लंघन होत असतं. वय किंवा परिस्थितीमुळे अनेकदा मुलांना याची जाणीव नसते किंवा कधी असली तरी ते कसं थांबवावं हे कळत नाही. अलिकडच्या काळात मुलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचं कार्य सामजिक कार्यकर्ते करत असले तरी हे हक्क मुलांना मिळवून देण्याची जबाबदारी प्रामुख्यानं पालक, विविध सरकारी यंन्त्रणा, स्वयंसेवी संस्था आणि इतरही प्रौढ व्यक्तींची आहे. पोलीस यंन्त्रणा हा यातला एक महत्त्वाचा घटक असतो.

आज पर्यंत भारतीय दंडविधान संहिता (IPC) आणि बाल न्याय अधिनियम (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, २००० यांच्या आधारे मुलांवरील लैंगिक गुन्ह्यांचा तपास केला जात होता.

महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यात १४-१५ वर्षाच्या मथुरा या आदीवासी मुलीवर २६ मार्च १९७२ रोजी देसाईगंज पोलिस ठाण्यात दोन पोलिसांनीच बलात्कार केला. सर्वोच्च न्यायालयानं या प्रकरणात जेव्हा गुन्हेगार निर्दोष असल्याचा निर्णय दिला तेव्हा या विषयावर पहिल्यांदाच देशभर असंतोष उसळला.परिणामी भारताच्या बलात्काराबाबतच्या कायद्यात बदल करण्यात आला.तरीही मुलांचं वय, पूर्ण विकसित न झालेलं शरीर आणि मन लक्षात घेता लैंगिक गुन्ह्यांचे त्यांच्यावर होणारे परिणाम अधिक गंभीर, त्यांच्या व्यक्तिमत्वावर, भविष्यावर दूरगामी परिणाम करणारे असतात याचं भान नव्हतंच. म्हणूनच मुलांच्या बाबतीतल्या लैंगिक गुन्ह्यांसाठी स्वतन्त्र कायदा असायला हवा अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वर्षं लावून धरली होती. ११डिसेंबर १९९२ रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या बाल हक्क संहितेला भारताने मान्यता दिल्यानंतरही तब्बल २० वर्षांनी ही मागणी 'लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा - २०१२' या नवीन कायद्याने पूर्ण होत आहे.याशिवाय फौजदारी कायद्यामध्ये नव्याने केल्या गेलेल्या तरतुदी,(Criminal Laws Amendment Act २०१३ IPC), कौटुंबिक हिंसाचार कायदा (Domestic Violence Act - २००५) किंवा इतरही कायद्यातील उपयुक्त तरतुदींचाही मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या खटल्यामध्ये उपयोग करता येणार आहे.

## 'लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा - २०१२'

या कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी थोडक्यात अशाः

या कायद्यात मुलांवरील लैंगिक अत्याचाराची व्याख्या लिंगभाव (जेंडर) निरपेक्ष केली आहे. म्हणजेच तरतुदी करताना मुलगी, मुलगा असा भेद केलेला नाही.अत्याचार करणारी किंवा बळीत व्यक्ती स्त्रीलिंगी किंवा पुल्लिंगी असू शकते.

## व्याख्या आणि अत्याचाराचे प्रकारः

स्पर्शाद्वारे आणि स्पर्शाशिवाय होणा-या सर्व प्रकारच्या अत्याचारांचा यात समावेश केलेला आहे. मुलांवरील लैंगिक आघात, लैंगिक छळ, अधिक गंभीर, विकृत अत्याचार, बलात्कार, अश्लील चित्रफीत मुलांना दाखवणं किंवा मुलांना वापरून असं साहित्य तयार करणं, फोटो घेणं एवढंच नव्हे तर या प्रकारचं साहित्य साठवणं अशा सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची दखल घेऊन गुन्ह्याच्या प्रमाणात कैद, सश्रम कारावास आणि दंड सांगितलेला आहे.

गुन्हेगार पोलीस, लष्करी अधिकारी, सुरक्षा अधिकारी, हॉस्पिटल, शैक्षणिक व धार्मिक संस्थेशी संबंधित, मुलांच्या संस्थांतील पदाधिकारी किंवा कर्मचारी असेल किंवा इतर कोणत्याही कारणाने मुलाचा ताबा ज्याच्याकडे आहे अशी व्यक्ती असेल तर त्यांचा स्वतंत्र स्पष्ट उल्लेख करुन अधिक कडक सजा सुनावली आहे. (ॲग्रिव्हेटेड सेक्शुअल ऑफेन्स).

## कोर्ट आणि खटला चालवण्याबद्दलची कार्यपध्दतीः

कोर्टाची  कार्यपध्दती आणि जबाब कसे नोंदवावेत हे तपशिलात दिले आहे.

न्यायालयात मुलाचे बालपण लक्षात घेऊन मैत्रीपूर्ण वातावरण, मुलाचा जबाब नोंदवताना तज्ज्ञ व्यक्तीची जरूर तेव्हा मदत घेता येण्याची तरतूद आहे. न्यायालयाचे कामकाज इन कॅमेरा म्हणजेच खुल्या कोर्टात न होता न्यायाधिशांच्या चेंबरमध्ये केले जाईल. मुलाचे पालक किंवा विश्वासातल्या माणसाला यावेळी मुलासोबत रहाण्याची परवानगी असेल.

मुलाचा जबाब व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे किंवा एकतर्फी आरसा, पडदा किंवा उपलब्ध असलेल्या योग्य त्या वस्तूचा वापर करून घेतला जावा, जेणे करून मुलावर दबाव येणार नाही व ते मोकळेपणाने बोलेल.

प्रकरण विशेष न्यायालयाकडे आल्यावर ३० दिवसात पुरावे नोंदवले जातील आणि एका वर्षाच्या आत प्रकरणांचा निकाल लावण्याचा प्रयत्न केला जाईल.

कायदेशीर शिक्षेव्यतरिक्त विशेष प्रकरणात न्यायालय आरोपीला मुलाचे पुनर्वसन किंवा उपचारासाठी थेट आर्थिक तरतूद करण्यास सांगू शकते.

प्रत्येक जिल्ह्यातल्या एका सेशन्स कोर्टाला विशेष कोर्टाचा दर्जा दिला जाईल. राज्य शासन हायकोर्टाच्या प्रमुख न्यायाधिशांशी सल्ला मसलत करून हे ठरवेल. राज्य सरकार प्रत्येक विशेष न्यायालयासाठी विशेष सरकारी वकीलाची नेमणूक करेल. या कोर्टात विशेष सरकारी वकिलासकट सर्व कर्मचारी महिला असतील.

अत्याचार १८ वर्षाखालील मुलाने केला असल्यास ते प्रकरण बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २०१५ या कायद्याकडे वर्ग केले जाईल.

विशेष बाल पोलिस पथक ( स्पेशल ज्युवेनाइल पोलिस युनिट) किंवा स्थानिक पोलिस ठाण्यातील बाल पोलिस अधिका-याकडे तक्रार

आली आणि अत्याचार झालेल्या मुलाला काळजी घेतली जाण्याची आणि संरक्षणाची गरज आहे अशी त्यांची खात्री पटली, तर कारणांची लिखित नोंद करून मुलाला २४ तासाच्या आत निवासी संस्थेत किंवा जवळच्या हॉस्पिटलमध्ये गरजेनुसार दाखल करण्याची कारवाई करणे बंधनकारक आहे.त्या प्रकरणाची तसेच केलेल्या कारवाईची माहिती बाल कल्याण समितीला, विशेष कोर्टाला आणि ते नसल्यास सेशन्स कार्टाला २४ तासात कळवणेही बंधनकारक आहे.

## शिक्षाः

गुन्ह्याच्या गांभिर्यावर आधारित शिक्षा सुचविली गेली आहे. जन्मठेप, तुरूंगवास आणि दंड.

- मुलाचा ज्या व्यक्तीवर विश्वास आहे अशा अधिकारी व्यक्तीनं गंभीर स्वरूपाचा अत्याचार (ॲग्रिव्हेटेड सेक्शुअल ऑफेन्स) केल्यास कमीत कमी १० वर्षाचा सश्रम कारावास जो जन्मठेपेतही बदलू शकतो शिवाय दंड अशी शिक्षा सुनावली आहे.
- लैंगिक आघात - ३ ते ५ वर्षं कारावास + दंड
- स्पर्शाशिवायचे  लैंगिक दुर्वर्तन - ३ वर्षं करावास साधा किंवा सश्रम + दंड
- अश्लिल साहित्य बनवण्यासाठी मुलाचा वापर - अशा प्रकारचं साहित्य वापरणं, साठवणं, प्रकाशित करणं, यासाठी ५ ते ७ वर्षं सश्रम कारावास + दंड तर अश्लिल साहित्य बनवण्यासाठी किंवा प्रत्यक्ष लैंगिक कृतीत सहभागी असलेल्यास १० वर्षं सश्रम कैद + दंड.
- प्रत्येक गुन्ह्यासाठी कायद्यात किमान शिक्षा निश्चित केलेली आहे. जरुर तर न्यायाधीश ती वाढवू शकतात पण कमी करु शकत नाहीत हे वैशिष्ठ्य.

## देखरेख आणि अंमलबजावणीः

या कायद्याची अंमलबजावणी होते की नाही हे पहाण्याची जबाबदारी देशामध्ये राष्ट्रीय बाल अधिकार आयोगाची तर प्रत्येक राज्यात राज्यस्तरीय बाल अधिकार आयोग आणि मुलांच्या हक्कांचे संरक्षण कायदा - २००५ यांची असेल.

दोन्ही सभागृहांचे एकमत झाल्यास न्याय मिळण्यात अडसर झालेले नियम कायदा लागू झाल्यापासून २ वर्षाच्या आत बदलता येतील. सरकारी दप्तरात मध्यवर्ती सरकार अशा बदलांचे अध्यादेश जारी करु शकते.

## तक्रार नोंदवणे - प्रथम माहिती अहवाल (FIR)

१. गुन्हा घडल्याची माहिती / तक्रार जवळच्या पोलिस स्टेशनवर त्यावेळी ड्यूटीवर असलेल्या अधिकाऱ्याकडे करणे.

२. ही तक्रार लिखित स्वरूपात असणं आवश्यक आहे परंतु तक्रारदार अशिक्षित असेल तर त्याची तोंडी तक्रार पोलीसांनी लिहून घेणं व त्याला ती वाचून दाखवून त्याची त्यावर सही घेणं आवश्यक आहे.

३. पोलीस स्टेशनच्या डायरीमध्ये या तक्रारीचा गोषवारा पोलीसांना लिहावा लागतो.

४. तक्रारदाराला एफ् आय् आर ची एक प्रत कोणतीही फी न आकारता पोलीस देणे लागतात.

५. ज्या व्यक्तीच्या बाबतीत गुन्हा घडला ती व्यक्ती, तिच्या वतीने दुसरे कोणी किंवा गुन्ह्याची प्रत्यक्षदर्शी कोणतीही व्यक्ती एफ् आय् आर दाखल करू शकते.

६. तक्रारीमध्ये गुन्ह्याचा पूर्ण तपशील असेलच असे नाही. तक्रारदाराला गुन्हेगाराचं नाव किंवा त्यानं कोणत्या परिस्थितीत गुन्हा केला हे माहीत असेलच असं नाही. हे सर्व तपशील मिळवणं हे पोलिसांचे काम आहे तक्रारदाराचं नाही.

७. टेलिफोनवरून कोणी तक्रार केली तरी पोलीसांनी त्याबाबत तपास करणं गरजेचं आहे.

८. १८ वर्षाखालील मुलाचं / मुलीचं स्टेटमेंट त्याच्या / तिच्या घरी जाऊन पोलिसांनी नोंदवलं पाहिजे पोलिस स्टेशनवर बोलावून नाही.

९. मुलाचं स्टेटमेन्ट त्याच्या परिचित जागी त्याला मोकळेपणा वाटेल अशा ठिकाणी नोंदवलं जावं. मुलाच्या विश्वासातल्या व्यक्तीला यावेळी सोबत हजर असण्याचा हक्क आहे.

१०. भाषा प्रौढांची नको.मूल जे सांगेल ते तसंच्या तसं, त्याच्याच भाषेत नोंदवलं गेलं पाहिजे नाहीतर उलट तपासणीच्यावेळी अडचणी येऊ शकतात.

११. मुलाचा जबाब नोंदवण्यापूर्वी सर्वप्रथम ज्या जागेत, वातावरणात त्याच्यावर अत्याचार झाला तिथून त्याला हलवलं पाहिजे.मग ते कुटुंब असो, संस्था असो की कामाची जागा असो.

१२. मुलाला प्रश्न विचारताना जरूर तेव्हा पोलिसांनी समूपदेशक किंवा मानसशास्त्र तज्ञाची मदत घेतल्यास मूल मोकळेपणानं बोलेल आणि नेमकी माहिती पोलिसांना मिळू शकेल.

१३.सामाजिक कलंकाची भीती तर कधी अत्याचार करणारी व्यक्ती परिचयातली किंवा जवळची असल्यामुळे मुलावरील लैंगिक अत्याचाराबद्दल तक्रार नोंदवणं तक्रार करणा-याला अनेकदा कठीण जातं. यासाठी मुलाला आणि तक्रारदारालाही पोलिसांनी संवेदनाक्षम पद्धतीनं वागवणं गरजेचं असतं.

१४. पोलीसांनी कायद्यातील अत्यंत योग्य आणि प्रभावी कलमं एफ् आय् आर मध्ये लावावीत. गुन्ह्याच्या गांभीर्यावर पोलीस किती गंभीरपणे तपास करतात हे अवलंबून असतं. उदा. संशयास्पद अवस्थेत घरकाम करणाऱ्या मुलाचा मृत्यू झाला असेल आणि ती आत्महत्या आहे की कसे तसेच लैंगिक शोषण झाले आहे का याची खातरजमा करून घेता येईल अशी कलमं लावायला हवीत.

१५. बळीत मूल व अत्याचार करणारी व्यक्ती एकाच ठिकाणी रहात असतील तर त्याची माहिती पोलीस ठाण्यातील व जिल्ह्यातील बाल संरक्षण अधिकाऱ्याला द्यावी.

केसपेपरमध्ये सर्व महत्त्वाचा तपशील नोंदवलेला असावा. कारण अनेकदा केस सुनावणीला येईपर्यंत बराच वेळ जातो. अशा वेळी गुन्हा नोंदवला त्या वेळचा पोलीस अधिकारी तिथे असेलच असं नाही.

## बाल कल्याण समिती (CWC)

बाल कल्याण समिती समोर लैंगिक अत्याचार झालेलं मूल आणलं गेल्यास अंमलात आणण्याची प्रक्रियाः

- समस्या संवेदनशीलतेने हाताळणे
- मुलाची मुलाखत खेळीमेळीच्या वातावरणात आणि कोणत्याही प्रकारचा दबाव न आणता घ्यावी
- मुलाला स्वतः दोषी आहोत असे वाटणार नाही आणि आत्मविश्वासाने मूल मन मोकळे करेल असे पहाणे
- बाल कल्याण समितीशी संबंधित स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक
- अत्याचारित मूल मुलगी असेल तर स्वयंसेवी संस्थेची स्त्री सदस्य हजर असणे आवश्यक
- मुलाचे लैंगिक शोषण कोण करीत आहे आणि त्याचे स्वरूप काय आहे हे निश्चित करणे
- कुटुंबातील मुलाच्या विश्वासातली व्यक्ती (शोषणकर्ता नसेल तर) मुलासोबत असू शकते
- मुलाच्या वयाची पडताळणी करून घेणे तसेच अत्याचार झालेल्या मुलाची / मुलीची वैद्यकीय तपासणी करून घेणे
- पूर्वग्रह किंवा नैतिकतेच्या आधारावर निर्णय घेतला जाणार नाही याची काळजी घेणे
- शोषणकर्ता कुटुंबातील असेल तर मुलाला त्वरीत कुटुंबापासून दूर सुरक्षित जागी हलवणे
- बाल कल्याण समितीने त्वरीत शोषण कर्त्याच्या विरोधात फौजदारी कार्यवाही करणे
- मूल संस्थेच्या काळजी आणि संरक्षणाखाली असेल तर गुन्हेगार व्यक्तीची माहिती समितीने ताबडतोब महिला व बाल विकास आयुक्तालयाला देणे
- स्थानिक पोलीस ठाण्याला प्रथम माहिती अहवाल तयार करण्यास सांगणे तसेच गरजेनुसार तपासणी करण्याची आज्ञा देणं
- जरूर तेव्हा स्वयंसेवी संस्था, कायदे तज्ञ, मानसिक आरोग्य तज्ञ आणि संकट निवारण केंद्र (क्रायसिस इंटरव्हेन्शन सेंटर) यांची मदत घेणे
- जरूर तर मुलाला इतर योग्य संस्थेत किंवा खात्रीपूर्वक सुरक्षा देऊ शकेल अशा व्यक्तीकडे बाल कल्याण समिती सोपवू शकते
- बाल कल्याण समितीच्या कक्षेत येणाऱ्या संस्थेमध्ये मुलांचे कोणत्याही प्रकारचे शोषण होणार नाही. असे काही घडलेच तर त्या बाबतच्या कारवाईची यन्त्रणा संस्थेत असेल याबाबत दक्षता घेणे
- पुनर्वसनाचा अराखडा तयार करताना मुलाचा विचार घेतला गेला आहे याची खात्री करून घेणे.

# ९. संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पाळावयाच्या बाल संरक्षणाबाबतची मार्गदर्शिका

## उद्देश :

लैंगिक दुर्वर्तन, अत्याचार किंवा शोषण करणारी व्यक्ती संस्थेच्या कर्मचा-यांपैकी, संस्थेशी संबंधित किंवा पदाधिकारी असेल तर अनेकदा संस्था प्रमुख तक्रार करण्याचे टाळतात किंवा तक्रारीला उशीर करतात. यामागे संस्थेचे नाव खराब होईल अशी भीती अनेकदा असते. असे प्रकार होऊ नयेत म्हणून कितीही दक्षता घेतली तरी ते होणारच नाहीत अशी १०० टक्के खात्री कोणीच देऊ शकत नाही.परंतु वेळेवर तक्रार करणे, अत्याचारी कोणीही असला तरी त्याच्या विरोधात ठाम भूमिका घेणे हे मुलांचे हित पदाधिका-यांच्या मनाशी सर्वाधिक महत्त्वाचे आहे याचे आणि संस्थेच्या पारदर्शक स्वच्छ कारभाराचे निदर्शक असेल.

मुलांच्या सुरक्षिततेसाठी संस्थेमध्ये आणि बाहेरही सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण करणे हे आपले लक्ष्य आहे. असे वातावरण ज्यात मुले तर सुरक्षित राहातीलच पण त्यांना सन्मानाने वागवले जाईल एवढेच नाही तर स्वतःचे संरक्षण स्वतः करण्याइतपत संस्थेतील मुले सक्षम आणि कृतीशील होतील.

**मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक निवासी तसेच अनिवासी संस्थेने संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी पुढील मार्गदर्शिकेवर आधारित बाल संरक्षण नियमावली बनवून अंमलात आणणे आवश्यक आहे.**

आमचा असा विश्वास आहे की प्रत्येक मूल मग त्याची जात, धर्म, वंश, वर्ण, देश किंवा लिंग कोणतेही असो लैंगिक शोषणापासून आणि इतर कोणत्याही शोषणापासून संरक्षण मिळणे हा त्या मुलाचा मूलभूत हक्क आहे.

## म्हणूनच आम्ही पुढील बाबींची जबाबदारी मनापासून स्वीकारत आहोत

**लैंगिक शोषणापासून मुलांना संरक्षण मिळावे या हेतूने बाल संरक्षण विषयक नियमांची अंमल बजावणी करून मुलांचे कोणत्याही प्रकारचे शोषण करणा-या कुठल्याही व्यक्तीचे या संस्थेसोबत संबंध राहता कामा नयेत.जर संस्थेतील कुणाही व्यक्तीने मुलांचे लैंगिक किवा कोणत्याही प्रकारचे शोषण केले तर त्या व्यक्ती विरुध्द कडक दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल.मुलाचे हित केंद्रस्थानी मानून अशा कारवाईचे स्वरूप ठरवण्यात येईल.**

**कुठल्याही प्रकारच्या अभिव्यक्तीद्वारे मुलांचा सहभाग असण्यावर आणि मुलांचे म्हणणे ऐकून घेण्यावर आमचा विश्वास आहे. म्हणूनच जिथे जिथे शक्य असेल तिथे तिथे मुलांना सामील करून घेतले जाईल.**

**कोणीही व्यक्ती खालील गोष्टी करणार नाही याची संपूर्ण काळजी घेण्याची बांधिलकी आम्ही मानतो.**

- कोणत्याही मुलाला मारहाण करणे, त्याचा शारीरिक, मानसिक छळ करणे / त्याचे लैंगिक शोषण करणे
- मुलगा अथवा मुलीसोबत शारीरिक / लैंगिक संबंध प्रस्थापित करणे
- मुलगा अथवा मुलीसोबत कोणत्याही प्रकारचे शोषण करणारे संबंध प्रस्थापित करणे.
- मुलांना त्रासदायक धोक्याचे ठरेल असे कुठल्याही प्रकारचे वर्तन करणे.
- अयोग्य किंवा लैंगिक उद्‌दीपन करणारी देहबोली किंवा तसे संकेत देणारे किंवा तसा आशय सुचवणारे सूचक वक्तव्य करणे.
- ज्या मुलांसोबत काळजी आणि संरक्षणाची प्रक्रिया सुरू आहे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारच्या दबाव तन्त्राचा वापर करणे.
- स्वतःचे काम मुलांकडून करून घेणे किंवा करायला भाग पाडणे.
- मुलांच्या बेकायदा आणि धोकादायक दुर्वर्तनामध्ये सहभागी होणे किंवा त्याकडे कानाडोळा किंवा दुर्लक्ष करणे.
- मुलांचा पाणउतारा होईल किंवा ती शरमेने संकोचून जातील किंवा त्यांना कमीपणा वाटेल अशा प्रकारचे वर्तन हेतुपुरस्सर करणे.
- काही निवडक मुलांना चांगली वागणूक देणे, त्यांना सवलती देणे आणि बाकीच्यांसोबत भेदभाव करणे

## आपण सर्वांनी पुढील गोष्टींची पूर्तता करायला हवी.

मुलांविषयी प्रेम आपुलकी वाटते म्हणून आपण मुलांसोबत काम करतो.मुलांचे हक्क कोणते ते आपण पुस्तिकेच्या सुरूवातीला पाहिले. ते प्रत्यक्षात कसे उतरतील हे माहीत असणे गरजेचे आहे.

- कार्यालयीन वेळेत आपण फक्त आणि फक्त मुलांचा विचार करायला हवा.
- प्रत्येक मूल हे वेगळे असते आणि त्याची विचार करण्याची क्षमता वेगवेगळी असते. त्याच्या आवडी-निवडी भिन्न असू शकतात ही गोष्ट कर्मचा-याने लक्षात ठेवणे गरजेचे आहे.
- प्रत्येक मूल हे स्वतन्त्र व्यक्तिमत्व आहे. त्याला / तिला अधिकार आणि जबाबदा-याही आहेत म्हणूनच मुलांचा सांभाळ करताना त्यांचा आदर करणे ही मोठ्यांची जबाबदारी आणि कर्तव्य आहे याची जाणीव सर्व कर्मचा-यांना असणे आवश्यक आहे.
- आपला जास्तीत जास्त वेळ मुलांसोबत घालवण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे मुलांमध्ये आणि आपल्यामध्ये आपुलकीचे नाते निर्माण होईल, त्यातून सर्वांचे काम सोपे होईल.

- मुलांशी खेळीमेळीनं वागून त्यांच्या आणि आपल्या वयातील दरी कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा.

- ज्या मुलांसोबत आपण काम करतो त्यांना आपले नाव, आपले संस्थेतील पद आणि त्या पदाची जबाबदारी काय आहे याची माहिती देणे आवश्यक आहे.

- मुलांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने संस्थेत काही ना काही कार्यक्रम आयोजित करत राहणे आवश्यक आहे. त्यावेळी मुलांचे म्हणणे लक्षात घ्यावे. त्यामुळे मुलांच्या मनात आपल्याबद्दल आदर आणि विश्वास निर्माण होईल.

- मुलामुलींमध्ये निकोप सहकार्याचे आणि खेळीमेळीचे संबंध निर्माण होण्याच्या दृष्टीने त्यांना एकत्र येण्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे, संधी देणे.इतर संस्थांच्याबरोबरही असे कार्यक्रम आयोजित करणे शक्य आहे.एकत्र येण्याची संधीच न मिळाल्यामुळे निर्माण होणारे एकमेकाबद्दलचे अवाजवी कुतुहल, आकर्षण आणि त्यातून घडणारी अविचारी कृती रोखण्यासाठी याचा उपयोग होऊ शकेल.

- छोट्या मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वयानुरूप मुलांचे गट पाडून त्यांची झोपण्याची व्यवस्था करणे.

- संस्थेच्या भल्याचा विचार करताना आपण सर्वांनी मुलांचे मत जाणून घेणे आवश्यक आहे.

- सर्व मुलांना हक्क आहेत हे मुळात आपल्याला एक कर्मचारी म्हणून पटलेले आहे का? याचा विचार करणे आणि स्वतःला वेळोवेळी तपासणे गरजेचे आहे. त्यामुळे आपले विचार आणि मुलांबाबतची संवेदनशीलता वाढायला मदत होईल.

- कर्मचा-यांनी सर्व मुलांना समान वागणूक, समान दर्जा आणि समान संधी देणे आवश्यक आहे.

- मुलामुलींना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी मोकळे वातावरण निर्माण करून महिन्यातून एकदा (गरजेनुसार अधिक सुध्दा) बैठका त्यांच्या सोयीनुसार आयोजित कराव्यात.

- आपल्या संस्थेत मुलांच्या सूचना आणि तक्रारीसाठी एक सूचना / संवादपेटी असावी. त्यामध्ये कोणीही मूल आपल्या नावासकट किंवा नावाशिवाय तक्रार किंवा सूचनेची चिठ्ठी टाकू शकते. ही पेटी वरिष्ठ अधिका-यांनी मुलांसमोरच उघडून आलेल्या सूचना आणि तक्रारी याची नोंद घेत योग्य ती कार्यवाही करावी. एखाद्या तक्रीबाबत विशेष चौकशी करण्याची गरज असल्यास मुलांना तशी माहिती द्यावी. मुलांना विश्वास वाटेल असे वातावरण तयार करावे.

- आपल्या संस्थेत किंवा आपल्या संस्थेच्या बाहेर आपल्या मुलांसोबत कोणत्याही प्रकारचा अत्याचार किंवा शोषण होत असेल तर संबंधितांनी ती बाब आपल्या वरिष्ठांच्या निदर्शनास आणून द्यावी. आवश्यक तेव्हा

वरिष्ठांच्या सहकार्याने पोलिसात तक्रार करावी / तक्रार करण्यास सहकार्य करावे.

- कोणतेही मूल गुन्हेगार नसते याची जाणीव कर्मचा-याने ठेवणे आवश्यक आहे.

- संस्थेत राहाणे हा कोणत्याही मुलासाठी अंतिम पर्याय असला पाहिजे.

- कर्मचा-यांनी स्वतःची मुले आणि संस्थेतील मुले असा भेदभाव करू नये.

- संस्थेच्या कर्मचा-यांना मुलांच्या हिताच्या सूचना वरिष्ठांकडे करण्याचा अधिकार आहे.

- स्वयंसेवक किंवा पाहुण्यांना मुलांचे फोटो किंवा चित्रफीत संस्थेच्या योग्य त्या अधिकारी व्यक्तीकडून तशी परवानगी घेतल्याशिवाय काढता येणार नाहीत याची कल्पना द्यावी.फोटो कशा पध्दतीने काढता येतील याबद्दल कडक निर्बंध असतील. ही सामुग्री दुस-या कोणत्याही कारणासाठी संस्थेबाहेर पूर्व परवानगीशिवाय वापरता येणार नाही. मुलांना ते फोटो दाखवले जावेत आणि शक्यतो त्यांच्या संमतीने हे केले जाईल असे पहावे.

- मुलांच्या छायाचित्रांचा वापर करताना त्यांची व्यक्तीगत ओळख पटणार नाही किंवा नेमके ठिकाण कळणार नाही याबद्दल संस्था काळजी घेईल.

- कोणत्याही कर्मचा-याने नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तीच्या कुटुंबातील बाल विवाहास हजर राहू नये. या बाबत जर काही माहिती समजली तर ती संबंधितांच्या ताबडतोब लक्षात आणून द्यावी.

- या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी संस्थेच्या कर्मचा-यांचे प्रशिक्षण आणि त्यांची समज वाढविण्यासाठी वेळोवेळी बैठका, जागृतीचे कार्यक्रम घेणे आवश्यक आहे.

- प्रत्येक कर्मचा-याला नियुक्तीच्या वेळी सदर नियमांची छापील प्रत वाचावयास सांगून त्यावर त्याची सही घेणे बंधनकारक आहे.

- संस्थेत येणा-या प्रत्येक व्यक्तीकडून सदर बाल संरक्षण विषयक नियम वाचून घेऊन ते बंधनकारक आहेत याची जाणीव देऊन त्यांची सही घेणे महत्वाचे आहे.

# १०. बरोबर की चूक?

**१. सहसा आपल्याशी झालेल्या लैंगिक दुर्वर्तनाचा अनुभव काही काळानं मुलं विसरून जातात.**

(**चूक.** लैंगिक अत्याचाराचे दुष्परिणाम मुलाच्या एकंदर वाढीवर होऊ शकतात. मुलाशी भावनिक दृष्ट्या जवळीक असलेल्या मोठ्या माणसानं समजून घेऊन मुलाशी संवाद साधला, जरूर तेव्हा जरूर ती मदत मिळवून दिली आणि मूल मोकळ्या वातावरणात वाढलं तर या अनुभवाचे दुष्परिणाम टिकणार नाहीत.)

**२. मुलांवर लैंगिक अत्याचार करणारी माणसं खालच्या सामाजिक स्तरातली / अशिक्षित असतात.**

(**चूक.** वस्तुस्थिती सांगते की असे अत्याचार करणारी माणसं सर्व सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्तरात आढळतात. शिकलेली तशीच अशिक्षित. घटनेचे तपशील फक्त बदलतात.)

**३. काही विशिष्ट गटातील मुले लैंगिक शोषणाला बळी पडतात.**

(**चूक.** घटनेचे तपशील बदलतात. ज्यांची आयुष्यं उघड्यावर आहेत त्यांच्या बाबतीतल्या घटना लपून राहात नाहीत एवढेच)

**४. काही वेळा मुलांना तो अत्याचार न वाटता ती त्याची मजा घेत असतात अशावेळी त्याला अत्याचार म्हणता येणार नाही.**

(**चूक.** वयात येणारा मुलगा किंवा मुलगी यांना तो अनुभव सुखाचा वाटू शकतो परंतु ती समजून उमजून त्या कृत्यात सामील झालेली नसतात. त्यांना परिणामांची कल्पना नसते. उदा. मुलीला दिवस जाऊ शकतात किंवा जाण आल्यावर स्वतःला दोषी समजणं, कुढणं याचा त्या मुलाच्या / मुलीच्या एकूण व्यक्तिमत्त्वावर परिणाम होऊ शकतो. अत्याचारी व्यक्ती मात्र समजून उमजून मुलाच्या निरागसतेचा गैरफायदा घेत असते म्हणून तो अत्याचारच म्हणायला हवा)

**५. मुलांवरील लैंगिक अत्याचार हे परदेशी संस्कृती आणि प्रसारमाध्यमांचे परिणाम आहेत हे खरे नाही.**

(**बरोबर.** आपल्याकडेही अशा घटना घडत आल्या आहेत. आपल्या समाजात त्याविषयी बोलण्याची पध्दत नाही. अलिकडे हे हळू हळू बदलते आहे)

**६. मुलांवरील लैंगिक अत्याचार हा अतिशय नाजूक आणि गुंतागुंतीचा विषय आहे त्यामुळे त्याची सार्वजनिक वाच्यता न केलेली बरी.**

(**चूक.** यामुळे अत्याचार करणा-यालाच मदत होते. तो अत्याचार करत रहातो. समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे.)

**७. लैंगिक शिक्षणामुळे मुलांवरील लैंगिक अत्याचाराचे प्रमाण वाढतं किंवा ती तसं करायला प्रवृत्त होतात.**

(**चूक.** लैंगिक शिक्षण दिलं नाही तरी मुलांमध्ये वयानुरूप कुतुहल उत्सुकता असतेच. ती चुकीच्या मार्गानं शमवली जाण्यामध्ये धोके अधिक आहेत.)

**८. सहसा मुलींवर लैंगिक अत्याचार होतात मुलांवर नाहीत.**

(**चूक.** दोघांवरही असे अत्याचार होत असतात. आपल्याकडे मुलांचं आणि मुलींचं सामाजिकीकरण

वेगवेगळ्या पध्दतीनं होतं. मुलगे अनेकदा असं काही झाल्याचं कबूल करणं कमीपणाचं समजतात.)

**९. अनेकदा मुली स्वतःचे वागणं, पेहेराव आणि हावभावामुळे अत्याचार ओढवून घेतात.**

(**चूक.** हे खरे असेल तर सत्तरीच्या बाईवरचा किंवा सहा महिन्याच्या कोवळ्या बालिकेवरचा लैंगिक अत्याचार आपण कसा समजून घेणार? वयात येणा-या मुलीच्या बाबतीत नटणं मुरडणं स्वाभाविक आहे. अत्याचारी तिच्या अवस्थेचा गैरफायदा घेत असतो.)

**१०. मुलाला लैंगिक शोषणापासून वाचवायचं असेल तर त्याच्यावर सतत नजर असायला हवी**

(**चूक.** ते सर्व वेळ शक्यही नाही. वयानुरूप मोकळा संवाद ठेऊन, योग्य ती माहिती देऊन मुलाला स्वतःला सुरक्षित ठेवायला, जरूर तेव्हा विश्वासातल्या व्यक्तीची मदत घेण्यात गैर काहीच नाही हे शिकवणं महत्वाचं.)

**११. सभ्य सुशिक्षित माणसं असले अत्याचार करत नाहीत असं मानणं बरोबर नाही.**

(**बरोबर.** कुणाला मिळालेल्या संधीचा, अधिकाराचा फायदा घेण्याचा कधी मोह होईल हे सांगता येत नाही.)

**१२. सहसा ओळखीची, सहवासातली, नात्यातली माणसं मुलांवर लैंगिक अत्याचार करतात.**

(**बरोबर.** मुलाचा त्या व्यक्तीवर विश्वास असतो, अशा माणसाचा मुलावर काही अधिकार असतो, मुलाबरोबर सहज एकांत मिळू शकतो आणि याचाच गैरफायदा घेतला जातो.)

**१३. आईवडील मुलांकडे नीट लक्ष देत नाहीत किंवा नोक-या करणा-या स्त्रीयांच्या मुलांवरच अत्याचार होत असतात.**

(**चूक.** कोणतंही मूल हे अनेक अर्थानं मोठ्यांवर अवलंबून असतं त्यामुळे कोणत्याही कुटुंबात अशा अत्याचाराची शक्यता असते.)

**१४. मुलांचं निष्पापपण जपणं हे आपलं काम आहे म्हणून त्याच्याशी लैंगिक दुर्वर्तनाबद्दल न बोलणंच बरं.**

(**चूक.** मुलाला वयानुरुप योग्य ती माहिती दिली गेली, योग्य अयोग्य स्पर्शाबद्दल सांगितलं गेलं तर मूल असा गैरफायदा घेतला जाण्यापासून स्वतःला वाचवू शकेल किंवा वेळेवर आपली मदत घेईल.)

**१५. लहानपणीच लग्न करून देणं हा मुलींना लैंगिक शोषणापासून वाचवण्याचा योग्य उपाय नव्हे.**

(**बरोबर.** मुलीची पूर्ण शारीरिक वाढ होण्यापूर्वी लग्न करणं अयोग्य आहे. लग्न झालेल्या मुलीवरही अत्याचार होऊ शकतो. शिवाय १८ वर्षं पूर्ण होण्यापूर्वी लग्न करणं हा कायद्यानं गुन्हा आहे.)

**१६. 'चांगल्या कुटुंबात' मुलांशी कोणी लैंगिक दुर्वर्तन करत नाहीत.**

(**चूक.** कुटुंबातील माणसांवर मुलांचा विश्वास असतो. कुटुंबातील माणसांचा मुलांवर काही अधिकार असतो, मुलांबरोबर सहज एकांत मिळू शकतो आणि याचाच अनेकदा गैर फायदा घेतला जातो. वेगवेगळ्या सामाजिक स्थरातल्या पालकांनी किंवा जवळच्या नातेवाईकांनी मुलांशी लैंगिक दुर्वर्तन केल्याची अनेक उदाहरणं आहेत.)

**१७. वेश्या व्यवसाय करणा-यांच्या मुलांना लैंगिक अनुभवाची सवय होऊन जाते.**

(**चूक.** कोणतीही मुलं ही मुलंच असतात. हा अनुभव सर्व मुलांना सारखाच क्लेशदायक असतो)

**१८. मुलांवरील लैंगिक अत्याचाराचा प्रश्न सोडवण्याची जबाबदारी मुख्यतः पोलीस आणि स्वयंसेवी संस्थांची आहे.**

(**चूक.** मूल जोपर्यंत आपल्यावर / मोठ्यांवर अवलंबून आहे तोवर त्यांची सुरक्षितता ही आपलीही तेवढीच जबाबदारी आहे. जरूर तेव्हा आपण पोलीस किंवा स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊ शकतो.)

**१९. असा अत्याचार झालेल्या मुलाला इतर मुलांमध्ये मिसळू न देणं चांगलं.**

(**चूक.** असं केल्याने मुलानं लवकरात लवकर तो त्रासदाय अनुभव मागे टाकून हसतं खेळतं होण्यात अडसरच येईल.त्या मुलाला जरुर ती मदत द्यावी पण एरवी इतर मुलांसारखंच वागवावं. नाहीतर इतर मुलंही तो / ती काही वेगळी आहे अशा रीतीनं वागायला लागतील.)

**२०. पुरूष तसंच स्त्रीयाही मुलांवर लैंगिक अत्याचार करतात**

(**बरोबर.** अत्याचारी स्त्रीयांची उदाहरणं कमी आहेत पण आहेत.)

**२१. लैंगिक दुर्वर्तन / लैंगिक अत्याचार / लैंगिक शोषण म्हणजे बलात्कार (रेप) होय.**

(**चूक.** मुलांवरील लैंगिक दुर्वर्तन किंवा अत्याचार स्पर्श करून किंवा न स्पर्श करताही असू शकतो. मुलाची शारीरिक, मानसिक आणि बौध्दिक वाढ पूर्ण झालेली नसते हे लक्षात घ्यायला हवं. त्यामुळे प्रत्यक्ष बलात्कार झाला नाही तरी अशा वर्तणुकीचे मुलावर गंभीर परिणाम होऊ शकतात.)

**२२. लहान बाळाच्या बाबतीतही असे अत्याचार घडू शकतात.**

(**बरोबर.** अशी अनेक उदाहरणं आहेत. त्यामुळेच लैंगिक उत्तेजन मिळाल्यानं माणसं अशी वागतात हा समज खोटा ठरतो.)

**२३. मुलावरील लैंगिक अत्याचाराची केस दाखल केली तर कुटुंबाची मानहानी होते.**

(**चूक.** अपराध्याला शिक्षा ही व्हायलाच हवी. तक्रार न करण्यानं अत्याचार करणा-याचेच फावते. हे आपण मुलाऐवजी त्यालाच मदत करण्यासारखे आहे. तो अत्याचार करत रहातो. त्याचबरोबर पोलिसात तक्रार करून पाठपुरावा करण्याची कुटुंबाची तयारी आहे का? मुलाची मानसिक तयारी आहे का? हे समजून घेऊन त्यांची तयारी करून घेऊन पुढचं पाऊल उचलणं महत्वाचं. नव्या कायद्यात तक्रार अनिवार्य केलेली आहे.)

**२४. अनेकदा मुलं लैंगिक अत्याचार झाल्याच्या खोट्याच गोष्टी रचून सांगतात.**

(**चूक.** मुलाचं वय आणि अनुभवाच्या मर्यादा लक्षात घेता तसं काही घडलं असल्याखेरीज लैंगिक कृतीचा तपशील देणं मुलाला शक्य होणार नाही. क्वचित कधी पालक किंवा मोठ्या कोणी मुलाला पढवलेलं असू शकतं पण ते ओळखणं अवघड नाही.)

**२५. कुमारिकेशी संभोग केल्यानं गुप्त रोग बरे होतात.**

(**चूक.** उलट त्या मुलीला तो रोग लागून तिचं जन्माचं नुकसान होऊ शकतं.)

# बाल लैंगिक शोषणाविरुद्ध कायद्यान्वये आणि नियमानुसार मुलं आणि अधिकारी यांच्यासोबतच्या संवादाची प्रक्रिया




Section (Sec.)/Rules under which First Information/Constitution/Appointment is provided for.

# संस्थेमध्ये मुलांवर किंवा मुलींवर खालील व्यक्तींकडून लैंगिक अत्याचार होऊ शकतो

## संस्थेचे कर्मचारी किंवा संस्थेशी संबंधित व्यक्ती

संस्थेत पूर्णवेळ / अर्धवेळ काम करणारी अथवा संस्थेतच राहून नोकरी करणारी व्यक्ती.

---

संस्थेचे पदाधिकारी आणि व्यवस्थापकीय प्रमुख

---

भेट देणाऱ्या व्यक्ती
- शिक्षक / प्रशिक्षक
- विद्यार्थी आणि स्वयंसेवक (देशातील अथवा परदेशातून आलेले)
- संस्थेला आर्थिक मदत करणारे (देशातील अथवा परदेशातील)

करारानुसार काम करणारे (उदा.सुतार, इलेक्ट्रिशियन, प्लंबर इ.कामगार, माळी इ.)

---

संस्थेतच रहाणारे दुसरे मूल

## संस्थेबाहेरील व्यक्ती

संस्थेबाहेर मुलाच्या संपर्कात येणारी बाहेरची व्यक्ती

---

शाळेतील कर्मचारी

---

शिकवणीच्या ठिकाणचे कर्मचारी, प्रशिक्षक (उदा. व्यायामशाळा, गायन, नृत्य,चित्रकला, कऱ्हाटे इ. चे शिक्षण देणारे) किंवा इतर कोणतीही मुलाला संस्थेबाहेर भेटणारी व्यक्ती

---

कुटुंबातील व्यक्ती मूल सुटीत घरी गेल्यावेळी

---

मूल ज्या वस्तीमध्ये रहाते तिथल्या व्यक्ती

**लैंगिक अत्याचार झाल्यास मूल / मुले त्याबद्दल सहसा खालील व्यक्तींकडे मन मोकळे करतील किंवा तक्रार करतील.**

**अत्याचाराबद्दल वाच्यता येथे होण्याची शक्यता असते**

संस्थेतील मित्र / मैत्रिण किंवा इतर मुले

संस्थेबाहेरचा मित्र / मैत्रिण

कुटुंबातील व्यक्ती

भेटीसाठी संस्थेत आलेली /येऊन गेलेली व्यक्ती

बाल कल्याण समिती

समुपदेशक

शाळेतील शिक्षक



# मुलावर / मुलांवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना लक्षात आल्यास मुलाला विश्वासात घेऊन खालील गोष्टी करायला हव्यात

POCSO कायद्याच्या २१व्या कलमाप्रमाणे लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंदवणे बंधनकारक आहे. व्यक्ती अगर संस्थेने तसे न केल्यास त्यासाठी शिक्षेची तरतूद आहे.

मुलासाठी संस्थेतील किंवा संस्थेबाहेरील समुपदेशकाची व्यवस्था करावी

संस्थेतील किंवा संस्थेबाहेरील वरिष्ठ अधिकारी व्यक्तीला घटनेची माहिती विनाविलंब द्या.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याला (WCDO) कळवा

मुलाला वैद्यकीय तपासणीसाठी जवळच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन जा.

मूल रहात असलेल्या जागेच्या जवळच्या पोलीस चौकीला किंवा विशेष बाल पोलीस कक्षाला (SJPU) कळवा

जिल्ह्यातील बाल कल्याण समितीला (CWC) कळवा (POCSO) कायद्यानुसार पोलिसही CWC ला कळवू शकतात)

वैद्यकीय तपासणीसाठी मुलाला नेताना सोबत त्याच्या विश्वासातील जाणती प्रौढ व्यक्ती असेल याची काळजी घ्या.

- पोलिसांनी संस्थेत किंवा मुलाला मोकळे वाटेल अशा ठिकाणी जाऊन मुलाचा जबाब नोंदवावा.
- PSI किंवा त्याहून वरच्या दर्जाच्या शक्यतो महिला पोलीस अधिकाऱ्याने मुलाचा जबाब नोंदवावा.
- मुलाचा जबाब नोंदवणारा पोलीस अधिकारी गणवेशात नसावा.
- मुलाचा जबाब नोंदवताना शक्यतो समुपदेशक सामाजिक कार्यकर्ता किंवा मुलाच्या विश्वासातील व्यक्ती मुला सोबत असावी.
- मुलाचा जबाब सोप्या आणि मुलाने वापरलेल्या भाषेतच नोंदवला जायला हवा.
- संपूर्ण प्रक्रियेच्यावेळी मुलाच्या विश्वासातली प्रौढ व्यक्ती सोबत असावी. ती व्यक्ती कोण असावी हे कृपया मुलाला ठरवू द्या.
- कायदेतज्ज्ञाचा सल्ला घ्या. प्रत्येक जिल्हा बाल पोलीस कक्षाकडे कायदेतज्ज्ञांच्या नावांची यादी असणे बंधनकारक आहे.
- भाषेची अडचण असेल तर (दुभाषाची मदत) किंवा विशेष गरजा असलेले मूल असेल आणि त्यासाठी तज्ज्ञ व्यक्तीच्या मदतीची गरज असेल तर ती जरूर घ्यायला हवी. DCPU कडे यांचीही यादी असणे बंधनकारक आहे.( POCSO कायद्यात याची तरतूद आहे).

सौजन्य प्रेरणा संस्था, मुंबई

वरील प्रक्रियेनंतर मुलाच्या मानसिक व वैद्यकीय गरजा लक्षात घेऊन त्यासाठी जरूरीप्रमाणे व्यवस्था करावी.

# मुलांचे लैंगिक शोषण किंवा अत्याचाराच्या प्रश्नावर खालील संस्था काम करतात

**Majlis Legal Centre**
A 2/4 Golden Valley, Kalina, Mumbai 400098
Tel: - 91-22-26662394 / 26661252
Fax: 91-22-26668539
Email: majlislaw@gmail.com
Website: www.majlislaw.com

**Prerana**
Ground Floor, Khetwadi Municipal School (Dagdishala)
Behind Alankar Theatre, 1st Lane,
Khetwadi, Grant Road (East),
Mumbai 400 004
Tel: - 22 2387 7637
Email: contactprerana@gmail.com

**Arpan**
9/3, Cama Industrial Estate,
Valbhatt Road, Goregaon (E),
Mumbai – 400 063
Tel: 26862444 / 26868444
M : 9819051444 for counseling support – 9819086444 / 9820135567
Email: pooja@arpan.org.in
website: www.arpan.org.in

**Balprafulta**
Krishnamai Satavse
Plot No. 5/1, 11-B-11 Vishakha Soc.,
Goregaon East, Mumbai – 400065
M : +919619730382

**CCDT**
Director Programs
Committed Communities Development Trust
Ground Floor, 42 Chapel Road
Bandra West, Mumbai - 400050.
Phone: +91 22 6688 1900/01
Web: www.ccdtrust.org

**CHILDLINE India Foundation**
406, Sumer Kendra, 4th floor,
P.B. Marg, Worli, Mumbai - 400018
Tel: 022 4903509 Childline: 1098

**Childline**
West Regional Resource Centre,
Unit No. 204/A, Seconf Floor,
Parvati Industrial Estate premises,
New Sunmill Compound,
Senapati Bapat Marg,
Lower Parel (W), Mumbai 400013
Tel: 022 2498 9630

**Karve Institute**
Aalochana
Building No.5, 2nd Floor,
Panchadri Society, Ashok Path,
Off Law College Road,
Pune - 411 004
Tel:- 2544 4122

**Pravin H. Patil**
Co-ordinator, KGPP
Dhanegaon, Po-Sonwati,
Tq. & Dist. -Latur.
M : - 9975998550/ 7588063604

कोणत्याही पोलिस स्टेशनवर आपण पॉक्सो कायद्याअंतर्गत तक्रार करु शकता. महिला आणि मुलांसाठी विशेष कक्ष असलेल्या काही पोलिस स्टेशन्सची यादी खालीलप्रमाणेः

**Special Cell for Women and Children**
Kandivali Police Station,
Swami Vivekananda Road, Opp. Shatabdi hospital, Kandivali (W), Mumbai – 400067
Tel: -022 – 24691753
M : - 9322208796

**Special Cell for Women and Children**
Vakola Police Station
Nehru Nagar Road, Amdabad Road, Vakola (E), Santacruz,
Mumbai – 400 055
Tel: - 022 – 26685236
M : - 9870716282

**Special Cell for Women and Children**
Dadar Police Station
Bhawani Shankar Road,
Shaitan Chowky, Dadar (W),
Mumbai – 400 028.
Tel: - 022 – 24691681
M : - 9221493193

**Special Cell for Women and Children**
Vikhroli Police Station, 1st Floor,
Kannamwar Nagar, No. 2,
Vikhroli (E), Mumbai -400083
Tel: - 022 – 25782240 / 25786991
M: - 9702110897

**Special Cell for Women and Children**
Kurla Police Station,
Near Bhabha Hospital, Serveshwar Marg,
Kurla (W) – 70
Tel: - 022 – 26500478
M : - 9322379509

**Special Cell for Women and Children**
CBD Belapur Police Station
Sector-1, Opp. CBD Belapur Bus Depot,
Navi Mumbai – 400614.
Tel: - 022 – 2758 0255
M : - 8108740748 / 9967400924

**Special Cell for Women and Children**
Office of the Superitendent of Police,
Beside Collector Office Wardha

**Special Cell for Women and Children**
Office of the Superintendent of Police, Pune Rural, Local Crime Branch, Chavan Nagar, Pashan Road, Pune – 411008.
Tel: - 0950 – 2565 1353
M : - 9767502284 / 9890668228

**Special Cell for Women and Children**
Nashik Taluka Police Station
Campus, Gangapur Road,
Nashik – 422 002.
Tel: - 095253 – 2309710

**Special Cell for Women and Children**
Gangapur Police Station,
Below Yashwantrao Chavan Pratishtan,
Nasik branch, Anandvali, Nasik - 422012.

**Special Cell for Women and Children**
Shahar Police Station,
Near Bus Stand, Shivtirth Road,
Dhule – 424001.
M : - 9552221557 / 9765536657

**Special Cell for Women and Children**
Office of the Superintendent of Police
Yavatmal
Tel: - 07232 – 243220 Extn: 225

**Special Cell for Women and Children**
Office of the Superintendent of Police
Aurangabad (Rural), Near Hudco T.V. Centre, Aurangabad – 431 003.
Tel: - 0240 – 2392633 / 2380978
Extn : 221

# सगळ्याच मुलांच्या सुरक्षिततेसाठी एकत्र येऊन आपण सर्वजण काम करू या.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:

**फोरम अगेन्स्ट चाइल्ड सेक्शुअल एक्सप्लॉयटेशन (फॅक्से)**

इमेल: facse95@gmail.com

मोबाइल नंबर: +९१ ९८६९९ ८९८४१

फॅक्से (१९९५) हे एक राज्यस्तरीय व्यासपीठ आहे. सामाजिक संस्था, संघटना, विविध उपचार पध्दतीतील तज्ञ, पत्रकार, नाट्यक्षेत्रातील व्यक्ती आणि इतरांचा समावेश फॅक्सेच्या सभासदांमध्ये आहे.

मुलांवरील लैंगिक अत्याचाराबाबत समाजामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण, नाटकाचे प्रयोग, पोस्टर्स-पत्रके-पुस्तिका इत्यादी प्रकाशित करून वितरित करणं, जाहीर कार्यक्रम करणं आणि कायद्याचा पाठपुरावा असं फॅक्सेच्या कामाचं स्वरूप आहे.

मुलांवरील लैंगिक अत्याचाराची प्रकरणं हाताळणं, एवढंच नव्हे तर मोठ्यांनी मुलांची काळजी कशी घ्यावी, मुलांनी या बाबतीत स्वतःला कसं सांभाळावं हे मुलांना शिकवण्याचं कामही फॅक्से करतं.

www.inhousedesign.in

FACSE FORUM AGAINST CHILD SEXUAL EXPLOITATION

महिला व बाल विकास WOMEN & CHILD DEVELOPMENT

unicef unite for children